शनिवार, १३ मे २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२४६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SATURDAY 13 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-246 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# ‘द केरला स्टोरी’ला पश्चिम बंगालमध्येच बंदी का ?

## सर्वोच्च न्यायालय : दोन राज्यांना बजावल्या नोटीसा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : सुदिप्तो सेन दिग्दर्शित ‘द केरला स्टोरी’ या चित्रपटावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. धर्मांतरण, ब्रेन वॉश आणि लव्ह जिहादवर या चित्रपटात भाष्य करण्यात आल्याने चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. त्यामुळे या चित्रपटाला राजकीय क्षेत्रातूनही मोठा विरोध होत आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी सरकारने या चित्रपटावर बंदी आणली आहे. याप्रकरणी चित्रपट निर्मात्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले होते. यावरून सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल सरकारलाच सुनावले आहे.**



सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड आणि न्यायाधीश पीएस नरसिंहा यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. संपूर्ण देशात हा चित्रपट प्रदर्शित केला गेला. मग पश्चिम बंगालमध्येच विरोध का?” असा प्रश्न खंडपीठाने पश्चिम बंगाल सरकारला विचारला आहे. हा चित्रपट देशातील उर्वरित सर्व राज्यांमध्ये दाखवला जात आहे. या चित्रपटाची कथा ज्या राज्यातील आहेत तिथेही हा चित्रपट दाखवला गेला. परंतु, काहीही घडलेले नाही. कलात्मक मुल्याशी वादाचा संबंध नाही. प्रेक्षकांना चित्रपट नाही आवडला तर ते पाहणार नाहीत, असे खंडपीठाने ज्येष्ठ वकिल अभिषेक सिंघवी यांना सुनावले. अभिषेक सिंघवी पश्चिम बंगालच्या बाजूने युक्तीवाद करत आहेत. गुप्तचर यंत्रणांच्या माहितीनुसार, या चित्रपटामुळे संबंधित भागात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा युक्तीवाद अभिषेक मनु सिंघवी यांनी केला. वरिष्ठ वकिल हरिश साळवे




चित्रपट निर्मात्यांच्या बाजूने युक्तीवाद करत आहेत. ते म्हणाले की, तमिळनाडूमध्ये या चित्रपटावर बंदी आहे. कारण थिएटर मालकांना धमक्या येत आहेत. त्यामुळे त्यांनी थिएटरमधून चित्रपट काढला आहे. त्यामुळे पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूमधील चित्रपट बंदीचे आदेश मागे घ्यावेत, अशी आमची मागणी आहे, असे हरिश साळवे म्हणाले. हरिश साळवेंनी तमिळनाडूचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर, सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी तामिळनाडूच्या सरकारलाही प्रश्न केला आहे. संभाव्य परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने काय पावले उचलली आहेत? चित्रपटगृहांना आग लागल्यावर, चित्रपटगृहातील खुर्च्या जाळल्यानंतर सरकार ॲक्शन मोडमध्ये येणार, असे राज्य सरकार सांगू शकत नाही, असेही चंद्रचूड म्हणाले. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल या दोन्ही राज्यांना नोटीसा बजावल्या आहेत. या नोटीसांना बुधवारपर्यंत उत्तर देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# सीबीएसई १० वीच्या निकालातही मुलींनीच मारली बाजी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता १२ वीनंतर आता इयत्ता १० वीचा निकाल जाहीर केला आहे. या वर्षी सीबीएसई बोर्डाचे इयत्ता १० वीतील ९३.१२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात मुलींचे उत्तीर्णतेचे प्रमाण ९४.२५ टक्के तर मुलांचे उत्तीर्णतेचे प्रमाण ९२.२७ टक्के आहे. मुलांपेक्षा मुलींनी १.९८ टक्क्यांनी चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे सीबीएसईच्या इयत्ता १२ वीच्या निकालाप्रमाणे इयत्ता १० वीच्या निकालात यंदा मुलींनीच बाजी मारल्याचे दिसतेय. विद्यार्थी cbseresults.nic.in, cbse.nic.in आणि cbse.gov.in वरून आपला निकाल पाहू शकतील. विद्यार्थी रोल नंबर, शाळा क्रमांक आणि प्रवेशपत्र आयडी सबमिट करू आपला निकाल पाहू शकतात.

सीबीएसईने इयत्ता १२ वीचा निकाल आज जाहीर करताना २०२४ या वर्षातील परीक्षा सुरू



होण्याची तारीखदेखील जाहीर केली आहे. सीबीएसई १५ फेब्रुवारी २०२४ मध्ये इयत्ता १० वी, १२ वीच्या परीक्षा घेण्यास सुरुवात करेल. सीबीएसईने विद्यार्थ्यांमधील अनहेल्थी स्पर्धा कमी करण्यासाठी इयत्ता १२ वीप्रमाणे इयत्ता १० वीतीलही टॉपर्स आणि मेरीट लिस्ट जाहीर न करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय सीबीएसई आपल्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी प्रथम, द्वितीय किंवा तृतीय मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावेही जाहीर करणार नाही. तसे सर्व विषयांमधील ज्या विषयांमध्ये सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या केवळ ०.१ टक्के विद्यार्थ्यांनाच सीबीएसई इयत्ता १० ची मेरिट लिस्ट

# उद्ध्वस्त राममंदिराचा मुस्लिम बांधवांकडून जीर्णोद्धार

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदाबाद :** गुजरातच्या अहमदाबादमध्ये




मुस्लिम समाजाने राम मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी मदत केली आहे. तौक्ते या चक्रीवादळात हे मंदिर उद्ध्वस्त झाले होते. या वादळात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. अमरेली जिल्ह्यातील झार गावात हे मंदिर बांधण्यात आले आहे. या मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी मुस्लीम समाजाने पुढाकार घेतला आहे. २०२१ मध्ये तौक्ते वादळ आले होते. या वादळाचा मोठा फटका बसला होता.

झार या गावात जे प्रभू रामाचे मंदिर बांधण्यात आले त्या मंदिरासाठी जमीन दान केली ती एका मुस्लीम माणसाने. बुधवारी राम कथाकार मुरारी बापू यांच्यासह धर्मगुरुंच्या उपस्थितीत हे पुनर्बांधणी करण्यात आलेले मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. झार या गावात हिंदू आणि मुस्लीम बांधव सलोख्याने राहतात. दाऊदभाई लालील्या यांच्या कुटुंबाने हीच परंपरा पुढे सुरु ठेवली आहे. दाऊदभाई लालील्या यांनी मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी फक्त मदत केलेली नाही. तर लाखो रुपयेही खर्च केले आहेत. तसेच त्यांच्या भाच्यानेही या मंदिरासाठी जमीन दिली आहे. मुस्लीम बांधवांनी घेतलेल्या या पुढाकाराचे कौतुक होते आहे. झार हे गाव १२०० लोकवस्तीचे आहे प्रभू रामाच्या मंदिराची पुनर्बांधणी झाल्यानंतर आणि मंदिर सगळ्या भाविकांसाठी खुले करण्यात आल्यानंतर दाऊदभाई लालील्या यांनी संपूर्ण झार गावासाठी भंडाराही आयोजित केला होता. १२०० लोकवस्ती असलेले हे गाव आहे. या गावात १०० मुस्लीम राहतात. या मंदिराच्या उद्घाटनासाठी अनेक धर्मगुरु आले होते. टाइम्स ऑफ इंडियाने याविषयीचे वृत्त दिले आहे.

या मंदिराच्या उद्घाटनानंतर संतसभा आयोजित करण्यात आली होती. आमच्या गावामध्ये हिंदू आणि मुस्लीम सगळे गुण्यागोविंदाने राहतो. आम्ही एकमेकांना हिंदू किंवा मुस्लीम असे मानत नाही. एकमेकांमध्ये सलोख्याचे वातावरण रहावे आणि आणि बंधुभावाचे असावे यासाठी आम्ही कायमच प्रयत्न करतो असे दाऊदभाई लालील्या यांनी म्हटले आहे. काँग्रेसचे दिवंगत नेते अहमद पटेल यांच्या कन्या मुमताझ पटेल या देखील या गावात आल्या होत्या.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# वो फिर नही आते...

आधुनिक केसरी

माणसाने एकदा स्वतःच्या विचारशक्तीचा ताबा रागाच्या स्वाधीन केला की प्रत्येक कृती विपरीत दिसायला लागते. सहानुभूतीपूर्वक, समजूतदारपणे विचार करण्याची शक्तीच नाहीशी होते. तू रागावलास, रुसलास, चिडलास तरी हरकत नाही. आपण कोणीच रागलोभ जिंकलेले संतमहंत नाही. पण त्याची परिणीती ' मधू मेला ' अशासारखी वाक्ये लिहिण्यात होऊ नये... तू आमच्या घरी येणार नाही असे म्हटलेस तरी तू जिथे असशील तिथे आम्हाला यावे लागेल. आयुष्यात फारतर एक किंवा दोन माणसे अशी येतात, की जिथे क्षुद्र व्यक्तिगत मानापमानाचे विचार उद्भवण्यापूर्वीच मोडून टाकावे लागतात. अशी स्नेहबंधने फार नसतात. तसे परिचित किंवा मित्रआप्त वगैरे खूप असतात. पण जिथे स्नेहबंधने एकरूपता असते अशी नाती कुठल्या तरी पूर्वयोगाने जमली असावी असे म्हणण्याइतकी दुर्मिळ असतात. सुखदुःखाच्या क्षणी त्यांनी जवळ नसणे हे दुःसह असते. अशा माणसांनी ही अशी आततायी वृत्ती धरून चालत नसते. ' पुल पुढे लिहितात, ' हसून खेळून आयुष्यातली दुःखे कमी करीत जगण्याची संधी असताना आपणच आपली आयुष्ये रागाने मलीन करीत असतो. राग येणे आपल्या हाती नसेल पण तो वाढीला न लागू देणे आपल्याच हाती असते. आपल्या अडचणी किंवा दुःखे व्यक्त करायच्या जागा माणसाला फार थोड्या लाभतात. आपल्यावर जीवापाड प्रेम करणारी माणसे याच त्या जागा. ..' असे खूप काही सुंदर या पत्रात आपल्याला वाचायला मिळेल. ज्यांना इच्छा असेल त्यांनी मुळातून वाचावे. जागेच्या आणि वेळेच्या मर्यादेअभावी येथे सर्व लिहिणे शक्य नाही. पण हे पत्र वाचल्यावर मला किशोरकुमारने गायलेलं ' जिंदगी के सफर मे गुजर जाते है जो मकाम वो फिर नही आते...' हे आपकी कसम या चित्रपटातलं गाणं आठवलं. एकदा अशी माणसं दुरावली की ती पुन्हा नाही येणार. म्हणून जपा आपल्या माणसांना जी आपल्यावर जीवापाड प्रेम करतात.





## आनंदी पहाट

# व्यक्तिमत्व विकासातील सक्रिय कालावधी महत्वाचा

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

एक आनंददायी व्यक्तिमत्व असे असते कि जे इतरांना मदत करण्यात आणि त्यांना मूल्यवान करण्यावर विश्वास ठेवते. आनंददायी व्यक्तिमत्त्व घडवण्यात तत्त्वे खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. सकारात्मक व्यक्तिमत्व वैशिष्ट्ये त्यामुळेच प्राप्त होणे शक्य होऊ शकते. जे लोक दयाळूपणा आणि प्रामाणिकपणा यासारखे गुण प्रदर्शित करतात, ते अधिक नकारात्मक व्यक्तिमत्त्व असलेल्या लोकांपेक्षा अधिक आकर्षक असल्याचे दिसून येते. व्यक्तिमत्व विकासाचा सर्वात सक्रिय कालावधी साधारणपणे २० वर्षे ते ४० वर्षे वयोगटातील असतो. जरी व्यक्तिमत्व वयानुसार आणि सामान्यतः ५० वर्षांच्या जवळ वय आणि वजन जरी सातत्याने वाढत असले तरी, व्यक्तिमत्व कधीही पूर्ण स्थिरतेच्या कालावधीपर्यंत पोहोचत नाही. चांगल्या चारित्र्यामध्ये निष्ठा, प्रामाणिकपणा, धैर्य, सचोटी, शौर्य आणि चांगल्या वागणुकीला प्रोत्साहन देणारे इतर महत्त्वाचे गुण समाविष्ट असतात. चांगले चारित्र्य असलेली व्यक्ती योग्य गोष्ट करणे निवडते कारण त्याला किंवा तिला असे करण्याचा नैतिकदृष्ट्या त्यांना अधिकार आहे असे वाटते. सिद्धांताद्वारे वर्णन केलेले पाच व्यापक व्यक्तिमत्व गुणधर्म म्हणजे बहिर्मुखता, सहमतता, मोकळेपणा, प्रामाणिकपणा आणि न्यूरोटिसिझम हे होत. आनंददायी व्यक्तिमत्व असलेला कर्मचारी असा असतो, कि जो कंपनीसाठी विविध समस्यांच्या उपायांमध्ये योगदान देतो. काय अन्यायकारक आहे, याबद्दल तक्रार करण्याऐवजी, तो किंवा ती प्रथम निर्णयामागील कारण समजून घेण्याचा प्रयत्न करतो आणि कंपनीच्या दोन्ही बाजूंना मध्यस्थी करण्याचा मार्ग शोधतो. व्यक्तिमत्व विकास तुम्हाला समाजाकडून तसेच आजूबाजूच्या लोकांकडून ओळख आणि स्वीकृती मिळविण्यात मदत करतो. व्यक्तिमत्व विकास केवळ एखाद्या व्यक्तीच्या व्यावसायिकच नव्हे तर वैयक्तिक जीवनातही महत्त्वाची भूमिका बजावतो. हे एखाद्या व्यक्तीला शिस्तबद्ध, वक्तशीर आणि त्याच्या / तिच्या जीवनासाठी एक मालमत्ता / संपत्ती बनवते.




आधुनिक केसरी

**संतात रमतो | आत्मा माझा ||**

ज्याच्या मनी भाव | जागे निरंतर ||
कृपा तयावर | हरि करी ||१||
कर्मावर भक्ती | निस्सीम जयाची ||
चिंता वाहे त्याची | विठु सदा ||२||
प्रेमाचा पाझर | काळजात फुटे ||
दुःख त्याचे फिटे | सर्वकाळ ||३||
ज्ञानाचिया संगे | मुढा होय ज्ञान ||
रेडाही सज्ञान | वेद बोले ||४||
प्रेम भाव भक्ती | अभंगात गातो ||
संतात रमतो | आत्मा माझा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

समन्वयेन चैतेन चित्तं हृष्टं हि जायते।
हृष्टे चित्ते वद त्वं रे
किं न तद् प्राप्यते नृणा ॥4॥
अशा समन्वयाने चित्त प्रसन्न होते. चित्त प्रसन्न झाले असता तू सांग, काय बरं ते प्राप्त होणार नाही ?




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

कर्मन फल की वासना,
करतापन अभिमान ।
यह बन्धन सब जानिये,
मोह माया अज्ञान ।।४४।।
(स्वर्वेद पंचम मण्डल द्वादश अध्याय)
०५/१२/४४

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
कर्मफळाची वासना आणि कर्म करण्याचा अभिमान हे सर्व अज्ञान, माया, मोहाचे बंधन आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## ज्ञानगंगा घरोघरी

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

हे अण्णांच्या दुरदृष्टी ला समजले असावे. म्हणून वडाच्या झाडाखाली मुलांना शिक्षण देण्यास सुरवात केली असं म्हणलं तर ती अतिशयोक्ती होणार नाही. वडाच्या पारंब्या जशा खोलवर रूजललेल्या असतात तशाच शिक्षण रूपी वड सर्व समाजात रूजू दे हा त्या मागचा गर्भितार्थ होय. अशा या "रयत शिक्षण संस्थेत"माझे वडील शिक्षक म्हणून होते याचा मला अभिमान आहे. कर्मवीर भाऊराव पाटील शाळेच्या कामासाठी आले की आमच्या घरी जेवण करत.अशी भाग्यवान माझी आई होती. की तिला अशा थोर माणसाला जेवण करण्याचं पूण्यकर्म करायला मिळाले. हे खुप आनंदाने सांगावेसे वाटते. भाजी,भाकरी, शेंगादाण्याची चटणी व गाडग्यातील दही हा साधा पण सात्विक आहार या शिक्षण महर्षी चा होता . किती साधा व सात्विक आहार होता .या शिक्षण महर्षीचा साधी रहाणी व ऊच्चविचारांचे अण्णा "कर्मवीरांच्या पद्कमली वाहू भक्ती भावची सुमने मानवतेला चढवली मांगल्याची नवभुषणे. "

# सत्समागम म्हणजे संत सांगतील त्याप्रमाणे वागणे

आधुनिक केसरी



कोणत्याही मंगल कार्यात सर्वाआधी गणपतीचे आवाहन करतात, आणि सगळे कार्य संपले की सर्वांचे शेवटी त्याचे विसर्जन करतात. त्याप्रमाणे अनुसंधानानेच पोथीला सुरुवात करावी आणि अनुसंधानानेच पोथीची समाप्ती करावी. लौकिक कार्यामध्ये गणपतीचे विसर्जन झाल्यावर आपण शिल्लक उरतो, पण अनुसंधानाचे विसर्जन करताना आपणही त्यात नाहीसे व्हावे. “जसे ठेवायचे असेल तसे ठेवा, पण आपला विसर पडू देऊ नका, एवढी भीक घालावी,” अशी गुरूच्या चरणी प्रार्थना करावी. भगवंताला विसरून भजन करू नका. भगवंताची आठवण ठेवून भाजी जरी आणली तरी त्याचे श्रेय जास्त आहे. जगाच्या लाजेला भिऊन भगवंताला अंतर देऊ नये. ‘मी कोण’ याचा विचार करावा, आणि तो करण्यासाठी, ‘मी नाही कोणाचा’ हे बघावे. मी आप्तेष्टांचा, बायको-मुलांचा, आईबापांचा तर नाहीच, पण मी देहाचा आणि मनाचाही नाही; असे करता करता जो राहील तो मी. खरे समाधान एकपणात आहे, अद्वैतात आहे. म्हणून, द्वैताचा जनक जो अभिमान तो कमी कसा होईल हे बघावे. याकरिता, मी कर्ता नसून देव कर्ता आहे असे मानावे, सर्वांभूती भगवद्भाव पाहावा, सत्समागम करावा. सत्समागम म्हणजे सत्याचा समागम. सत्पुरुषाच्या वचनावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनविणे हा खरा सत्समागम आहे. संतांवर अनन्य श्रद्धा ठेवा. त्यांच्या चालीने चाला. त्यांच्या समागमात दैन्य मानू नका. जे तुमची एकसारखी विषयातली नडच भागवतील ते संत नव्हेत. खरे संत विषयाची आसक्ती कमी करतात; अशा संताला शरण जावे. निर्विषय चित्त संतांनाच करता येते. संत हे ईश्वरदर्शनाची तळमळ उत्पन्न करतात. तळमळ उत्पन्न करून देणे हीच संतांची कामगिरी. संतांची भाषा तळमळीची असते, म्हणून ती तळमळ उत्पन्न करते. संत सांगतील त्याप्रमाणे वागावे. जग संतांशिवाय असणेच शक्य नाही. जे देहात दिसले पण वस्तुतः देहातीत राहिले ते संतच होत. आम्हांला त्यांना ओळखता येत नाही याला काय करावे ? नामाच्या योगानेच संत ओळखता येतात, जोडता येतात आणि टिकवता येतात. जो भगवंताचे नाम घेईल त्याला संत भेटेल, आणि तो त्याला भगवंताची प्राप्ती करून देईल. त्याचे कुठे अडणार नाही. पण जो नुसत्या शब्दज्ञानाच्या मागे लागेल त्याला आसक्ती सुटणार नाही, आणि त्याचे जीवन सार्थकी लागणार नाही.

**आजचे बोधवचन आहे - संताच्या पदरात पडले की तो आपली लाज राखतो. श्रीराम समर्थ**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

तुका म्हणे कुडें । कळों येतें तें रोकडें ॥७॥
दुर्जनाची गंधी विष्ठेचिया परी । देखोनियां दुरी व्हावें तया ॥१॥
अइका हो तुम्ही मात हे सज्जन । करूं संघष्टन नये बोलों ॥ध्रु.॥

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

क्षणशः कणशचैव विद्यामर्थं च साधयेत् ।
क्षणत्यागे कुतो विद्या कणत्यागे कुतो धनम् ॥
स्पष्टीकरण - आठ महिने केवळ खेळण्यात वाया घालवायचे आणि शेवटचे महिना-दोन महिने अभ्यास करून कसेबसे परीक्षेत उत्तीर्ण व्हायचे, याला विद्या मिळविणे म्हणत नाहीत. ज्ञानासाठी क्षणाक्षणाचा प्रयोग करावा लागतो. धनाचेही तसेच आहे. लहान लहान फायद्याविषयी जागरूक राहूनच मोठा धनलाभ साधता येतो.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, १३ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# पीरबावडा येथे विवाह सोहळ्यात अनोखी वरात

## स्वामी विशुद्धानंदांकडून वधू-वरास 50 हजारांचे बक्षीस : टाळ मृदंगाच्या ठेक्यावर वऱ्हाडींचा ठेका

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश बोकील**

**पीरबावडा :** येथे काळे-जाधव परिवाराचा अनोखा विवाह सोहळा पार पडला. या विवाह सोहळ्याची पिरबावडा परिसरासह तालुक्यात मोठी चर्चा होत आहे. आज काल लग्न म्हटले की लाखो रुपये खर्च करून डी.जे, बॅंड, बॅंजो लावून मद्यधुंद तरुणाई नवरदेवाच्या वरातीत नाचतात यामुळे अनेकदा डी.जे.च्या आवाजाने त्रास होऊन जीव ही जातात तर मद्यधुंद तरुणाईमुळे लग्नात भांडण तंटे ही होतात व लग्न सोहळ्याचा आनंद जातो.

पीरबावडा येथील काळे व जाधव परिवाराने अनोख्या पद्धतीने नवरदेवाची वरात काढून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. लग्नात नवरदेवाची वरात टाळ, मृदंगा च्या गजरात भजनाच्या ठेक्यांवर देहभान विसरून वर्‍हाडी तल्लीन होऊन नाचत होती यात फुगडी, लंगडी, पावली आदी वारकरी संप्रदायाच्या कलेवर महिला, पुरुष तरुणांनी एकसाथ ठेका धरून आजच्या भरकटलेल्या तरुणाई व समाजाला आदर्श दिला. या विवाह सोहळ्यात वारकरी संप्रदाय मोठ्या संख्यने उपस्थित होता आणि त्यांच्या कलागुणांनी लग्न सोहळ्यात भक्तिमय वातावरण तयार झाल्याने उपस्थित मंडळी चे डोळ्यांचे पारणे फेडणारा हा विवाह सोहळा संपन्न झाला. विशेष म्हणजे वर-वधू कडील मंडळीही वारकरी असल्याने त्यांना या विवाह सोहळा कायम स्मरणात राहील असा झाला. तर या आदर्श विवाह सोहळा भरकतेल्या समाजास दिशा देणारा ठरणार असून यासाठी वधू-वराच्या भावी आयुष्यासाठी वाघोळा येथील गायत्री आश्रमाचे स्वामी विशुधानंद यांनी पन्नास हजारांचे बक्षीस यावेळी दिले. या विवाह सोहळ्याने उपस्थित मंडळींना मोठा संदेश तर दिलाच परंतु सदरील लग्नातील भक्तिमय वातावरणात निघालेल्या नवरदेवाच्या वरातीचे व विवाह सोहळ्याचे जिल्हाभरात चर्चा होत असून व्हिडीओ ही मोठ्या प्रमानात व्हायरल केले जात आहे.




**स्वामी विशुद्धानंद तीर्थ गायत्री आश्रम वाघोळा**
सध्या डी .जे मुळे आपल्या पिढ्या व्यसनाधीन होत आहेत काळे–जाधव यांच्या विवाह सोहळ्यात भारतीय संस्कृती चे दर्शन बघायला मिळाले ही काळाची गरज असून ज्या भक्तिमय वातावरणात विवाह सोहळा पार पडला याने दोन्ही परिवाराचे आदर्श संस्कार दिसून आले यामुळे मी भारावून गेलो आणि लग्नात वधू वरास बक्षीस म्हणून पन्नास हजार दिले . जे आम्ही प्रवचनात, कीर्तनात सांगत असतो ते प्रतक्ष बघून मन आनंदी झाले .

**वधू श्रद्धा काळे–जाधव**
घरातील वातावरण नेहमी वारकरी संप्रदायाचे आहे माझ्या वडील–आजोबांची इच्छा होती ती पूर्ण झाली भक्तिमय वातावरणात झालेला विवाह सोहळा आम्हां सर्वांच समाधान झालं .

**वर दत्ता जाधव**
डी . जे . वगैरे वाद्या मध्ये तरुणाई दारू पिऊन नाचतात यामुळे व्यसन लागते डीजे च्या आवाजाने त्रास होतो . परंतु आपल्या टाळ, मृदंगा ने कुठल्याही प्रकारचे त्रास न होता अगदी तल्लीन होऊन नाचता येत, गाता येत यातून आत्मिक व प्रमार्थिक आनंद ही मिळतो म्हणून आम्ही व वारकरी संप्रदायातील मंडळींनी माझ्या विवाह सोहळ्यात हा निर्णय घेतला .

**सरपंच सारंग गाडेकर पीरबावडा**
असे विवाह होणे ही आताच्या काळाची मोठी गरज असून प्रत्येक वर, वधू व घरातील मंडळी यांनी लग्न सोहळ्यात विनाकारण खर्च होणार नाही, तरूणाई व्यसनाधीन होणार नाही याची जबाबदारी घ्यायला हवी .

# २२ वर्षांच्या हिंदू तरुणीला नमाज पठणाची उच्च न्यायालयाकडून संमती

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** २२ वर्षांच्या एका हिंदू तरुणीला दर्ग्यावर नमाज पठण करण्याची संमती उच्च न्यायालयाने दिली आहे. या तरुणीने तिचा धर्म बदललेला नाही. तसंच मुस्लीम तरुणाशी विवाहही केलेला नाही. मात्र आपल्याला नमाज पठण करण्याची संमती मिळावी यासाठी या तरुणीने उत्तराखंड उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर निर्णय देताना कोर्टाने तिला नमाज पठणाची संमती दिली आहे. उत्तराखंड उच्च न्यायालयात एका हिंदू मुलीने याचिका दाखल केली होती. या याचिकेत तिने कलियर शरिफ या ठिकाणी नमाज पठण करण्याची संमती मागितली होती. तसेच या मुलीने आपल्याला नमाज पठणाच्या वेळी सुरक्षा पुरवली जावी असेही म्हटले होते. त्यानुसार कोर्टाने तिला सुरक्षा प्रदान करण्याचेही निर्देश दिले आहेत. न्यायालयाने नमाज पठण करण्याआधी या महिलेला स्टेशन हाऊस ऑफिसरला सुरक्षेसंदर्भात पत्र देण्यास सांगितले आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी २२ मे रोजी होणार आहे.

# बंगालच्या उपसागरात मोचा चक्री वादळाचा धोका वाढला; पावसाची शक्यता


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** बंगालच्या उपसागरात मोचा चक्रीवादळाने तीव्र रुप धारण केलं आहे. हे चक्री वादळ आता उत्तर-ईशान्य दिशेने पुढे सरकण्याची शक्यता आहे, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. या चक्री वादळामुळे १७५ किलोमीटर वेगाने वारा वाहणार असून मच्छिमार, जहाजे, बोटी आणि ट्रॉलर यांना मध्य आणि ईशान्य बंगालच्या उपसागरांत आणि उत्तर अंदमान समुद्रात न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसंच, भारताच्या अनेक भागात पाऊस पडण्याचाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मोचा चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर एनडीआरएफच्या आठ टीम पश्चिम बंगालमध्ये तैनात करण्यात आल्या आहेत. मोचा चक्री वादळ १२ मे रोजी तीव्र होईल आणि १४ मे रोजी अत्यंत तीव्र चक्रीवादळात रुपांतरित होईल. संभाव्य परिस्थिती टाळण्यासाठी ८ टीम तैनात केल्या आहेत. तर, एनडीआरएफचे २०० बचावकर्ते कार्यरत असून १०० बचावकर्ते राखीव ठेवण्यात आले आहेत. भारतात विविध ठिकाणी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. रविवारी ) नागालँड, मणिपूर आणि दक्षिण आसाममध्ये अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांचे निलंबन मागे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांना शिंदे-



फडणवीस सरकारने मोठा दिलासा दिला आहे. महाराष्ट्र सरकारने त्यांच्यावरील सर्व आरोप मागे घेतले असून निलंबनही मागे घेतले आहे. विविध भ्रष्टाचाराच्या आरोपानंतर तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने डिसेंबर २०२१ मध्ये परमबीर सिंह यांच्यावर निलंबनाची कारवाई केली होती.

महाविकास आघाडी सरकारचा हा निर्णय शिंदे फडणवीस सरकारने मागे घेतला आहे. तसेच परमबीर सिंह यांच्यावर झालेले सर्व आरोपही मागे घेण्यात आले आहेत. विशेष म्हणजे निलंबनाच्या काळात परमबीर सिंह सेवानिवृत्त झाले होते. त्यामुळे निलंबन मागे घेतलं असलं तरी ते सेवेत पुन्हा रुजू होऊ शकत नाहीत. सरकारच्या या नवीन निर्णयानंतर निलंबनाच्या कालावधीत परमबीर सिंह हे सेवेवर होते, असे गृहीत धरले जाणार आहे. या निर्णयाद्वारे शिंदे-फडणवीस सरकारने परमबीर सिंह यांना मोठा दिलासा दिला आहे.परमबीर सिंह यांनी महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केले होते. त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून महाविकास आघाडीमध्ये खळबळ माजवून दिली होती. वेगवेगळ्या महत्त्वाच्या ठिकाणावरून पैसे गोळा करायला लावले जातात, खंडणी गोळा करायला लावली जाते, असे आरोप परमबीर सिंह यांनी केले होते. त्यांच्या आरोपानंतर अनिल देशमुखांना तुरुंगवासही झाला होता. दरम्यान, परमबीर सिंह यांच्यावरही भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते. विविध पोलीस ठाण्यात परमबीर सिंह यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाल्यानंतर महाविकास आघाडीने डिसेंबर २०२१ मध्ये त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली होती. पण शिंदे फडणवीस सरकारने परमबीर सिंह यांना दिलासा देत त्यांचे निलंबन मागे घेतले आहे.

**परमबीर सिंह यांचे आरोप आणि अनिल देशमुख यांना जेलवारी**
:महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात अनिल देशमुख हे महाराष्ट्राचे गृहमंत्री होते . मुंबईचे पोलीस आयुक्त असताना परमबीर सिंह यांनी त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले होते . अनिल देशमुख यांनी बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझेला दर आठवड्याला 100 कोटी रुपयांच्या वसुलीचे टार्गेट दिले होते . या आरोपांनंतर अनिल देशमुख यांनाही मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता . याशिवाय अनिल देशमुख यांनाही भ्रष्टाचाराच्या आरोपावरुन तुरुंगात जावे लागले होते .



# बृजभूषण पोलिसांसमोर हजर

आधुनिक केसरी

दोन आठवड्यांहून अधिक काळ दिल्लीच्या जंतर मंतरवर भारताच्या कुस्तीपटूंनी आंदोलन पुकारले आहे. भारतीय कुस्तीपटू महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभुषण सिंह यांनी महिला कुस्तीपटूंवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी गुन्हाही दाखल केला होता. आता याप्रकरणी ब्रिजभुषण सिंह यांनी दिल्ली पोलिसांसमोर हजर राहत जबाब नोंदवला आहे. तसेच ब्रिजभुषण सिंह यांनी त्यांच्यावर लावलेले सर्व आरोप फेटाळले आहेत. याप्रकरणी एएनआ या वृत्तसंस्थेने माहिती दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुस्तीगिरांनी तक्रार केल्यानंतर ब्रिजभुषण सिंह यांचा जबाब नोंदवून घेतला आहे. तसंच, त्यांच्याकडून काही कागदपत्रेही मागवण्यात आली आहेत. दरम्यान, याप्रकरणी पुढील चौकशीकरता एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये चार महिला अधिकारी आणि सहा पोलीस अधिकारी असणार आहेत. पोलीस उपायुक्तांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन झाली आहे. महासंघाचे सचिव विनोद तोमर यांचाही जबाब यावेळी नोंवण्यात आला आहे. दिल्ली पोलिसांच्या एफआयरमध्ये विनोद तोमरसुद्धा आरोपी आहे. ब्रिजभुषण सिंह यांना काही व्हिडीओ आणि मोबाईल डेटा सादर करण्यास सांगितला आहे. याप्रकरणाची चौकशी करण्याकरता दिल्ली पोलीस उत्तर प्रदेश, झारखंड, कर्नाटक आणि हरयाणा येथे गेले होते. तेथून त्यांनी काही पुरावे गोळा केले आहेत. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून साक्षी मलिक, विनेश फोगाट आणि बजरंग पुनिया यांनी दिल्लीच्या जंतरमंतरवर आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनाला देशभरातून चांगला पाठिंबा मिळत आहे. देशभारतील नागरिकांकडून पाठिंबा मिळण्याकरता काल (११ मे) त्यांनी सोशल मीडियावर एक हॅशटॅगही ट्रेन्ड केला होता. या हॅशटॅगला अनेकांनी प्रतिसाद दिला आहे. तसेच, बृजभूषण सिंह यांना अटक होत नाही तोवर आम्ही येथून हलणार नसल्याचीही भूमिका या खेळाडूंनी घेतली आहे.



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# तेच ते नाटक किती वेळ पाहणार ?

आधुनिक केसरी

**मला सत्ता राजकारणातले फारसे कळत नाही.पण ताजा सुप्रीम निकालाने डोळे उघडण्याचे नव्हे तर डोळ्यात झणझणीत अंजन घालण्याचे काम केले. ज्या लोक प्रतिनिधींना आपण लोकशाही मार्गाने निवडून देतो, त्यांनी संविधानाच्या चौकटीत राहून लोकहिताचे काम करावे ही माफक अपेक्षा असते. पण ही मंडळी जे मदारीचे खेळ खेळतात ते पाहून थक्क व्हायला होते. क्वचित लाज वाटते.लोकशाहीत देखील सत्ता संघर्ष नवा नाही. वेगवेगळे डावपेच खेळले जातात निवडणुकीच्या राजकारणात. पण हे गलिच्छ राजकारण जेव्हा वैयक्तिक भांडणात, द्वेष, सूड भावनेने ग्रासले जाते तेव्हा प्रश्न निर्माण होतात.**



कारण आपण विश्वासाने ज्यांना आपल्या भल्या साठी, कल्याणा साठी निवडून दिले ती मंडळी मुख्य आद्य कर्तव्य सोडून भलत्याच दिशेने कुस्तीच्या फडात रंगत जातात.वाहवत जातात. याचा तरुण पिढीवर, सामान्य जनतेवर काय परिणाम होईल याची त्यांना पर्वा नसते. ते आपल्याच स्वार्थाच्या चिखलात मस्त असतात. हे समाजाच्या सृजनाच्या दृष्टीने मला अत्यंत घातक वाटते.

माझे वैयक्तिक , कौटुंबिक राग लोभ , माझे स्वार्थी निर्णय, माझे अतार्किक, अविचारी निर्णय जर समाजाच्या प्रगतीवर विपरित परिणाम करत असतील तर ते सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने धोका दायक आहे. लोकांनी आम्हाला निवडून दिले म्हणून त्यांच्या प्रती आमचे दायित्व आहे असे निवडणुकी आधी वरवर दाखवायचे, अन् एकदा लोकांनी निवडून दिले, आमदार, खासदार हे बिरूद लागले, खुर्च्या , गाड्या मिळाल्या, की मग लोक, सामाजिक दायित्व वगैरे सारे काही विसरून राजकारणी डावपेचात धुंद, बेभान व्हायचे हे कुठल्याही पक्षाचे, कुठल्याही पुढाऱ्यांचे ब्रीद ठरून गेल्यासारखे झाले आहे.

आता कुणी म्हणेल की मत देणे, तुमच्या हातात आहे.कुणाला निवडून द्यायचे हा जनतेचाच अधिकार आहे. तरी मग भ्रष्टाचारी, आरोपी, दुराचारी, स्वार्थी मंडळीच बहु संख्येने निवडून का येतात ? म्हणजे एकीकडे आपण या दूषित राजकारणी मंडळी कडे एक बोट दाखवतो. पण बाकी सारी बोटे आपल्याकडे रोखली असतात. कारण त्यांची निवड आपणच केलेली असते! असा सगळा पेच आहे, तिढा आहे न सुटणारा!

खोलात जाऊन गांभीर्याने विचार केला तर चूक आपलीच असते.आपण या मदाऱ्याच्या खेळात भुलतो.खोट्या आश्वासनांचा पगडा असतो. गोर गरीबांना लालुच दाखवली जाते. विकत घेतले जाते. विकत, वाहवत जाणारे बहुसंख्य असतात, गांभिर्याने विचार करणाऱ्या पेक्षा! इथेच गणित चुकते. आपल्या हाती मदाऱ्याचा तमाशा पाहणे एव्हढेच असते. जे आपण आता पर्यंत करीत आलो.आजही करीत आहोत! तुमच्या लायकीचे सरकार तुम्हाला मिळते असे राजकीय तत्व सांगते. म्हणजे कठपुतली चे दोर आपल्याच हातात आहेत. पण आपण हे दोर स्वतःकडे न ठेवता या आपणच निवडून दिलेल्या मंडळीच्या हातात देऊन टाकलेत! घ्या, नाचवा आम्हाला हवे तसे, असे म्हणत. हे या नेत्यांना चांगलेच फावले. त्यामुळे हेशे दोनशे लोक प्रतिनिधी लाखो, करोडो लोकांना अक्षरशः आपल्या तालावर नाचवताहेत. अन् आपण नाचतो आहोत. खरी शोकांतिका ही आहे. हे जेव्हा आपल्याला समजेल, उमजेल तेव्हाच कदाचित चित्र बदलेल. कदाचित शब्द मुद्दाम वापरलाय. कारण हे सारे आपल्याला समजेल उमजेल की नाही, त्यावर आपण वेगळा पोजिटिव्ह विचार करू की नाही, याबद्दलच शंका आहे!गेल्या ७५वर्षात असे काही घडले नाही म्हणून! म्हणजे सरकारे उलथली ,यांच्या ऐवजी दुसरे कुणी आले. एव्हढेच.त्याने फरक असा पडलाच नाही. क्रांतिकारक म्हणता येईल असा बदल झालाच नाही. मागील पाना वरून पुढे चालू असे तेच कथानक पुढे गेले. याला झाका त्याला दाखवा, असा उंनिस बीस फरक फार तर. बाकी मूळ परिस्थिती जैसे थे!

आता पुन्हा या लोकशाहीला नवा आयाम देण्याची वेळ आली आहे. एकूणच निवडणुका, सरकार, त्यांचा कारभार, त्यावर जनतेचा अंकूश, प्रतिनिधींना धडा शिकविण्यासाठी समाज शिक्षण, लोक जागृती अशा सर्वच अंगांनी पुनर्विचार व्हायला हवा. आपल्या पेक्षा बळकट लोकशाही कुठे आहे, अधिक सजग, जागरूक समाज कोणत्या देशात आहे, जनतेच्या विकासाला पोषक, आनंद दायी राजकीय समाज व्यवस्था कुठे आहे याचा जाणकारांनी गंभीर विचार करायला हवा. अशा वेगवेगळ्या पद्धतीचा विचार व्हायला हवा. आपले संविधान बळकट आहे, उत्कृष्ठ आहे. कायदेही उत्तम आहेत. पण कशाचेच कुणी पालन करतांना दिसत नाही. सरते शेवटी सुप्रीम कोर्टाची चपराक कुणाला बसते, कुणावर ताशेरे ओढले जातात, याचीच आपण वाट बघत बसतो. त्यात आपलीच वाट लागते हे आपण विसरतो. कारण व्हायचे ते ड्यामेज होऊन गेले असते. खुर्च्या वरील मंडळी बदलून गेलेली असतात. नवे नाटक नव्या कलाकारांसह सुरू झालेले असते. पात्रे बदलली तरी कथा तीच असते. कदाचित नेपथ्य, प्रकाशयोजना बदलली जाते,आपल्याला भुलवायला! आपणही वेडे भुलत जातो. आता हे नाटक थांबवायला हवे. त्यासाठी नवी संहिता हवी. नवे दिग्दर्शन हवे. नवे संगीत, नवे तालसुर हवेत. बदलायचेच तर बॅक ड्रॉप अन् दर्शनी पडदा देखील नवा हवा. मग बघा कशी मजा येते!



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

# लोणार सरोवरालाही प्लास्टिकचा विळखा

आधुनिक केसरी

**बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर हे जागतिक आश्चर्य आहे. हजारो वर्षांपूर्वी लोणार विवर एका अशनीच्या पृथ्वीवर आदळल्याने तयार झाले आहे. प्रत्येक वर्षी पंधरा हजार टन वजनाच्या उल्का पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करतात. पण पृथ्वीच्या वातावरणात जळून नष्ट होतात. पण अनेक हजार वर्षात ह्या उल्कांचे अशनी मात्र लोणार सारखाच एखादाच होतो. उल्का जेंव्हा पृथ्वीवर आदळते तेंव्हा त्याला अशनी म्हणतात. सुमारे ५२००० वर्षांपूर्वी असाच एक अंदाजे ६० मीटर जाडीचा आणि १० हजार टन अशनी लोणार इकडे पृथ्वीला धडकला. ह्या धडकण्याने जवळपास ६ मेगा टन शक्तीचा स्फोट झाला. आपल्याला ज्ञात असलेल्या हिरोशिमा नागासाकी इथली शक्ती ०.२५ मेगाटन इतकीच होती.**

म्हणजे लोणार इथली धडक पूर्ण भूतलावर त्यावेळी जाणवली असेल असा शास्त्रज्ञांचा होरा आहे. इतक्या प्रचंड टक्करीमुळे पृथ्वीसुद्धा आपल्या व्यासात हलली असेल असं काही शास्त्रज्ञ सांगतात. इतक्या प्रचंड ऊर्जेमुळे २.८ किलोमीटर व्यासाच तसेच १३७ मीटर खोलीच विवर तयार झालं. या विवराचं म्हणजेच सरोवराचं पाणी खारे आहे. हे सरोवर पाहायला आणि उल्का आणि अशनी मधील फरक अनुभवायला जगभरातील लोक लोणार सरोवराला भेट देतात. आज मात्र याच जगप्रसिद्ध लोणार सरोवरची प्रदूषणाने दुर्दशा झाली आहे. या सरोवरालाही प्लास्टिकने घेतले आहे. प्लास्टिकमुळे हा जागतिक वारसा धोक्यात आला आहे. पुणे आणि मुंबई येथील संशोधकांनी केलेल्या संशोधनात या सरोवरात १६ प्रकारचे वेगवेगळे प्लास्टिकचे कण आढळून आले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबईतील महाराष्ट्र कॉलेज यांनी केलेल्या संयुक्त संशोधनात हे आढळून आहे. अत्यंत दुर्मिळ शैवाल तसेच जिवाणूंचे या सरोवरात हजारो वर्षापासून अस्तित्व आहे मात्र प्लास्टिकमुळे त्यांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्लास्टिक आणि प्लास्टिकच्या सूक्ष्म कणांमुळे सरोवराचे सौंदर्य, संरचना आणि तेथील पर्यटनही धोक्यात आले आहे. लोणार सरोवरात असलेल्या सीता न्हाणी कुंडात स्नानासाठी कायम गर्दी असते. प्लास्टिकच्या कॅरिबॅगा लोक परिसरात फेकून देतात. याच बॅग उडून सरोवरात जातात. त्यामुळे सरोवरची अतिप्राचीन जीवसृष्टी आणि जैव रासायनिक प्रक्रियेलाच धोका निर्माण झाला आहे. लोणार सरोवराला पडलेला हा प्लास्टिकचा विळखा सोडवायला हवा. त्यासाठी लोणार सरोवर परिसरात प्लास्टिकवर बंदी घालायला हवी आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करायला हवी. लोणार सरोवर परिसरात



येणाऱ्या यात्रेकरू आणि पर्यटकांसाठी प्लॅस्टिक प्रदूषण, त्याचे दुष्परिणाम या संदर्भात जागरूकता अभियान राबवण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी शासन आणि वन विभागाने समन्वयातून सरोवर परिसरात प्लॅस्टिकच्या वापराला योग्य तो प्रतिबंध घातला पाहिजे, असेही तज्ज्ञांनी सांगितले.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



## श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर

जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977


सौजन्य : इंटरनॅशनल स्पोर्टस,
2, सरस्वती संकूल, सिटी बँकजवळ, एस.बी. बसस्टँडसमोर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर. मो. 9673538888

# जगप्रसिद्ध अजिंठा लेणीत कॅमेरा, बूम घेऊन बातमी संकलन करण्यास पत्रकारांना नो एंट्री

## वरिष्ठ अधिकारी सेक्युरिटीगार्ड यांना कोणाचा आशीर्वाद

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापुर येथे अजिंठा पर्वत रांगांमधे सुंदर कलाकृती निसर्गरम्य अजिंठा लेणी आहे या लेणीमधे तथागत गौतम बुद्ध यांच्या खडक दगडांमधे सुंदर कोरिव काम करुन सुंदर मुर्ती बनवलेल्या आहे हे सर्व सुंदर कलाकृती निसर्गरम्य वातावरण सप्तकुंड धबधबे बघण्यासाठी जगातील पर्यटक या ठिकाणी येतात आणि पर्यटकांसाठी कोनकोनत्या सुविधा या ठिकाणी दिल्या जातात कीवा दिल्या जात नाही लेणी मधे चुकीचे नेमके काय प्रकार घडतात या साठी पत्रकार आतमधे जाऊन बातमी संकलन करुन जनतेच्या ज्याही समस्या असतात त्या. पत्रकार शोधुन पर्यटकांची प्रतिक्रीया घेऊन पोलखोल करतात समोर मांडतात म्हनुण आता आत मधे काय प्रकार सुरु आहे येना-या पर्यटकांना कोनकोनत्या सुविधा देण्यात येतात



त्यांच्या समस्या कुनाला कळुनये आणि आत काय मनमाणी सुरु आहे हे कुनालाच कळता कामानये यासाठी पत्रकारांना अजिंठा लेणीमधे बातमी संकलन करण्यासाठी कमेरा, बग, बुम घेऊन लेणीमधे आत प्रवेश बंदी घातलेली आहे. या अगोदर पत्रकारांनी या अजिंठा लेणीमधे होनारा मनमानी कारभार बेजबाबदार पणा समोर आनला होता. मात्र आता आत मधे काही ही झाले तरी पत्रकारांना अजिंठा लेणीमधील दृष्य कमे-यामधे टीपता येनार नाही आतमधे पर्यटकांची प्रतिक्रीया घेण्यासाठी बुम कमेरा नेता येनार नाही असे नियम अजिंठा लेणीचे वरिष्ट अधीकारी यांनी लागु केलेले असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे पत्रकार जसे आत मधे प्रवेशद्वारा समोर जाताच त्यांची बग ,बुम, कमेरा जप्त करुन जमा करण्यात येतात त्यानंतरच पत्रकारांना आत मधे प्रवेश दिला तो या साठी .की पत्रकारांनी आतमधील कमे-याने कोनतेही शुट घेऊनये आणि कोनत्याही समस्या दाखवुनये एक ही बातमी संकलन करुनये यासाठीच पत्रकारांवरती ही बंदी निर्बंध लादण्यात आले आहे आत मधुन आल्यानंतर पत्रकारांना त्यांचे साहित्य बग, बुम, आणि कमेरा परत दिले जातात अशाप्रकारे कडक नियम निर्बंध पत्रकारांसाठी अजिंठा लेणीचे वरिष्ट अधिकारी यांनी लागु केलेले आहेत या बेजबाबदार अधिकाऱ्यांनी मनमानी- हुकुमशाही अजिंठा लेणीमधे सुरु केलेली आहे.



# राज्यातील सत्तासंघर्षाचा धोका तूर्तास टळला

## केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री दानवे : आ. बंब यांचा कौतुकास्पद उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** मतदारसंघातील बेरोजगार तरुणांना घेऊन दिल्या प्रत्येकी दोन जर्सी गायी; आमदार बंब यांचा कौतुकास्पद उपक्रम खुलताबाद तालुक्यात सुरू केला आहे. या उपक्रमासाठी जे काही सहकार्य लागेल ते मी करण्यास तयार आहे असे केंद्रीय अर्थराज्य मंत्री डॉ. भागवत कराड यांनी बोलताना सांगितले आहे व या उपक्रमास शुभेच्छा दिल्या आहेत.
गंगापूर- खुलताबाद मतदारसंघातील तरुणाच्या हाताला काम मिळावा म्हणून, आ. बंब यांनी आगळीवेगळी योजना राबवली आहे, असे माजी विधानसभा अध्यक्ष तथा विद्यमान आमदार हरिभाऊ बागडेनाना यानी भाषणात सांगितले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एका आमदाराने तब्बल 2300 गायी खरेदी केल्या असून, आणखी दीड हजार गायी खरेदी करणार आहे. विशेष म्हणजे या गाई स्वतःसाठी नाही तर मतदारसंघातील बेरोजगार तरुणांसाठी खरेदी केल्या जात आहे. गंगापूर- खुलताबाद मतदारसंघाचे आमदार तथा भाजप नेते प्रशांत बंब यांनी हा अनोखं उपक्रम सुरु केले आहे. आपल्या मतदारसंघातील तरुणाच्या हाताला काम मिळावा म्हणून, आ. बंब यांनी आगळीवेगळी योजना राबवली आहे. राज्यातच नव्हे तर देशभरात बेरोजगारीचा प्रश्न गंभीर बनला आहे. फक्त शहरच नव्हे तर गावागावात बेरोजगार तरुणांची फौज पाहायला मिळतेय. अशातच मराठवाड्यातील एका आमदाराने या बेरोजगार तरुणांच्या हाताला रोजगार देण्यासाठी एक विशेष मोहीम सुरू केली आहे. ग्रामीण भागातील तरुणांना स्वावलंबी करण्यासाठी भाजप आमदार प्रशांत बंब यांनी ही मोहीम सुरू केली आहे असेही बोलताना दानवे म्हणाले आपल्या मतदारसंघातील गरजू तरुणांना त्यांनी प्रत्येकी 2 जर्सी गायी घेऊन दिल्या आहेत. त्यामुळे या दुग्ध व्यवसायातून ग्रामीण भागातील बेरोजगार तरुण महिन्याला 20 ते 21 हजार रुपयांची कमाई करतायेत असे प्रस्ताविक करताना आमदार बंब म्हणाले. आ. बंब यांच्याकडून राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमाला गीता बन प्रकल्प असे नाव देण्यात आले आहे. ज्यात एका शेतकऱ्याला दोन गायी देण्यात आल्या आहेत. एका गाईची किंमत 80 ते 90 हजार रुपये आहे. एक गाय दररोज 18 ते 20 लिटर दूध देते. त्यामुळे दोन गायींचे सुमारे 40 लिटर दूध मिळते. यासाठी अमूल डेअरी 27 रुपये लिटरप्रमाणे दूध विकत घेत आहे. 40 लिटरचे रोज 1480 रुपये मिळतात. ज्यात चारा, ढेप, सरकी, वैद्यकीय उपचार आदींसाठी दररोज 600 ते 700 रुपये खर्च लागतो. तो जाऊन महिन्याकाठी 20 ते 21 हजार रुपये उत्पन्न महिन्याला होणार आहे. ज्यातील दरमहा 10 हजार रुपये बँकेत जमा करून दीड वर्षात गाय शेतकऱ्याच्या मालकीची होईल. आणखी 1500 गायी घेतल्या जाणार आमदार प्रशांत बंब यांनी पहिल्या टप्प्यात पंजाबमधून 2300 गायी विकत घेतल्या आहेत. तसेच दिवाळीच्या वसुबारसपर्यंत आणखी 1500 गायी घेतल्या जाणार नाही. दूध विक्रीतून 750 तरुण स्वतःच्या पायावर उभे राहावेत यासाठी हा प्रकल्प सुरू करण्यात आला असल्याची माहिती आमदार बंब यांनी दिली आहे. गायी देताना पाच अटींचा समावेश लाभार्थी दुधाच्या व्यवसायात नसावा त्याला किमान 1 एकर शेती असावी. वासराला दररोज किमान 3 लिटर दूध पाजावे शेतकऱ्यांच्या मुलांनाही मुबलक दूध द्यावे. आणलेल्या गायींचे वय 2 ते 4 वर्षे आहे. त्या सरासरी 10 वर्षे दूध देतील.

# डॉ. श्री.भा. जोशी यांच्या हस्ते दोन साहित्यकृतींचे रविवारी प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** सुप्रसिद्ध कवी, कथाकार आणि चित्रकार प्रा.नंदू वानखडे यांच्या 'ज्याला नाही माय' या कथा संग्रहाचा तसेच 'अंतर्मनातील आंदोलने' या कविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा रविवार, १४ मे रोजी सकाळी ९.३० वाजता गोंदियातील 'संथागार विहार' येथे आयोजित करण्यात आला आहे. प्रा. नंदू वानखडे हे वाशिम जिल्ह्याच्या मुंगळा येथील रहिवासी असून सध्या गोंदियाला आहेत. अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे पूर्व अध्यक्ष तथा ख्यातनाम संवाद तज्ञ आणि समीक्षक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या हस्ते दोन साहित्य कृतींचे प्रकाशन होणार आहे. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक युवराज गंगाराम राहणार असून सदर साहित्य कृतींवर कवी, कथाकार, प्रमोदकुमार अणेराव, कवी, प्रा. डॉ.सुरेश खोब्रागडे हे भाष्य करणार आहेत.

महाराष्ट्र Business Katta












# राजकीय टोळीयुद्ध, वर्तन नाही शुद्ध



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. भारतामध्ये संविधान लागू झाल्यानंतर अमुलाग्र बदल झालेले आहेत. लोकशाहीच्या माध्यमातून जनतेचा विकास व्हावा व एका हाती सत्ता जाऊ नये या गोष्टीचा विचार करून संविधानाची व लोकशाहीची निर्मिती झालेली आहे. परंतु संविधान तयार झाल्याबरोबर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी एक वक्तव्य केले होते, ते वक्तव्य म्हणजे संविधान कितीही चांगले असले तरी ते चालवणारे लोक जर लायक नसतील तर कितीही चांगले असलेले संविधान हे निरर्थक ठरेल. आणि आज अशाच लायक नसलेल्या लोकांमुळे संविधानाची अंमलबजावणी होत नाही.**

संविधानाची अंमलबजावणी होत नसल्याने काही परिणाम होतात हे संपूर्ण भारत बघत आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मते राजकारण ही माणसाच्या यशाची चावी आहे, माणसाला सर्वांगीन विकास करून घ्यायचं असेल तर, राजकारणाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. एवढे चांगले व प्रभावशाली असलेले राजकारण या लोकांनी एवढे मलीन करून टाकले की आज सर्वसामान्य लोकांना, नितीवान लोकांना, राजकारणात येण्याची भीती वाटत आहे. राजकारणाचे बदलते स्वरूप पाहून राजकारण मनोरंजनाचा भाग झालेला आहे. मनोरंजन म्हणून राजकीय बाईट लोक बघताना दिसत आहेत. देशाचे राजकारण हे शिक्षण, नोकरी, आरोग्य सुविधा मूलभूत सुविधा यावर होऊन महागाईवर नियंत्रण करण्यासाठी सरकारने काम करायला पाहिजे. व याबाबतीत योग्य ते काम होते की नाही, कामामध्ये गुणवत्ता येते की नाही, हे काम लोकांच्या हिताचे आहे की विरोधात आहे, शासनाने घेतलेला एखादा निर्णय जनहिताला घातक तर नाही ना, एखाद्या निर्णयामुळे लोकांचे कोणते नुकसान तर होत नाही ना, हे बघण्याची काम विरोधी पक्षाचे असते. काम पारदर्शक गुणवत्तेचे व्हायला पाहिजेत म्हणून विरोधी पक्ष सरकारवर दबाव निर्माण करत असतो. वैचारिक व योग्य कामासाठी सत्ताधारी व विरोधक यांच्यामध्ये मतभेद असायलाच पाहिजेत, त्याशिवाय लोकशाही टिकत नाही. परंतु आजचे चित्र जर बघितले लोकशाहीला बाजूला सारून, तत्वांना बाजूला सारून, या राजकीय लोकांनी राजकीय टोळ्या बनवून आपापसात टोळी युद्ध सुरू केलेले आहे. राजकीय पातळी एवढी घालवलेली आहे की राजकीय नेते जनतेची कामे शिक्षण, आरोग्य, महागाई, बेरोजगारी आणि त्याच्या मूलभूत सुविधा, या कोणत्याही गोष्टीवर चर्चा न करता एकमेकांच्या विरोधात वैयक्तिक, पातळीवर जाऊन, खाजगी गोष्टीवर बोलून एकमेकांचा विरोध करत आहेत. राजकीय टोळी युद्ध सुरू असताना हे राजकारणी आपण कोणत्या संस्कारातून आलोत, आपल्यावर कोणते संस्कार घातलेले आहेत, आपण लोकांचे प्रतिनिधी आहोत, या सर्व भावना विसरून जाऊन जेवढ्या खालच्या पाठीवर जाता येईल तेवढ्या खालच्या पातळीवर जाऊन एकमेकांना विरोध करतात. एकमेकांना शिव्या देतात, अनेक वेळा असंविधानिक भाषेचा सुद्धा वापर यांच्याकडून केला जातो, राजकीय नेते भडकाऊ भाषणे करून, आक्रमक बोलुन एकमेकांना आमने-सामने येण्याची आव्हान करतात. यांचे वर्तन बघुन असं वाटते की हे लोक जनतेचे प्रतिनिधी नसून टोळीचे सदस्य आहेत. आणि एक टोळी दुसऱ्या टोळीवर हल्ला करून स्वतःच्या टोळीचे अस्तित्व व महत्त्व वाढवणार आहे अशीच परिस्थिती दिसते. जनतेने निवडून दिलेल्या लोकांनी अरे रवी ची भाषा करणे, एकमेकांना धमकी देणे, आक्रमक भाषा वापरून भेटायला बोलावणे, लायकी काढणे, वैयक्तिक पातळीवर जाऊन खाजगी विषयांवर बोलणे, हा अधिकार तर भारतीय संविधानाने ही दिला नाही, आणि ढोबळमानाने विचार केला तर कोणत्याही घरातील व्यक्ती आपल्या मुलांवर असे संस्कारही घालत नाही. तरीही राजकीय लोक अशा खालच्या पातळीवर जाऊन आपली टोळी बनवून एकमेकांच्या विरोधात वैचारिक नव्हे, तर वैयक्तिक विरोध वैचारिक वाद नव्हे तर धमक्या देऊन मारामारी करण्याचा वाद निर्माण करणारे लोक, खरंच जनतेचे नेते किंवा जनतेचे प्रतिनिधी असू शकतात काय? जनतेच्या प्रश्नावर एकही शब्द न बोलणारे शिक्षण, आरोग्य, बेरोजगारीव महागाई याविषयी एकही शब्द न बोलणारे, आपला विरोधाक दिसला की त्याला मारण्याची त्याला औकात दाखवण्याची भाषा वापरतात. या टोळींना जर वैयक्तिक वादच करायचे असतील, तर राजकारण सोडून वैयक्तिक वाद बिनधास्त करावे. त्यामध्ये कोणाला काहीही रुची नाही. कोणाच्याही वैयक्तिक वादामध्ये जनता आडवी सुद्धा




येणार नाही. परंतु जनतेच्या नावावर निवडून यायचे, जनतेच्या नावावरचा पैसा स्वतःच्या फायद्यासाठी खर्च करायचा, जनतेच्या पैशाने फिरायचे, जनतेच्या पैशांनी खायचे, आणि जनतेची विषय न मांडता आपापले वैयक्तिक वाद हा उकरून काढून एकमेकांवर टीका करायची, हे कोणत्याही संस्कार बसत नाही. यापेक्षा टपोरी टोळ्या चांगल्या म्हणाव्या लागतील, कारण टोळी युद्ध ते साधारण सर्वसामान्य सामान्य लोकांच्या मध्ये, सर्वसामान्य लोकांना त्रास होईल अशा ठिकाणी तरी काही करत नाहीत. मीडियासमोर सर्वसामान्य लोकांसमोर, लोकांच्या पैशावर मौज करून करतात, राजकीय टोळी युद्ध करणे लोकांच्या समस्येवर न बोलणे हे शुद्ध आचरणाचे लक्षण आहे का? हा प्रश्न त्यांनी स्वतःलाच विचारणे आवश्यक आहे. आपले संस्कार कोणते आपली संस्कृती काय? आपण आदर्श कोणाला म्हणतो? आणि आपली कृती कशी आहे? याची जर जाणीव नसेल तर, त्या व्यक्तीला माणूस म्हणून आणि नेता म्हणून समाजात राहण्याचा कोणताही अधिकार नाही. आपण जनतेचे प्रतिनिधी आहोत, जबाबदार व्यक्ती आहोत, आपले प्रत्येक वक्तव्य, प्रत्येक शब्द हा जबाबदारीने, आदरपूर्वक बाहेर पडायला पाहिजेत, प्रत्येक शब्दातून जनतेचा, संविधानाचा, सन्मान व्हायला पाहिजेत. आपल्या कृतीतून द्वेष नव्हे तर काम दिसले पाहिजे. परंतु असे न होता राजकीय टोळ्यांनी वेगळेच रूप धारण करून देशाचे वाटोळे करायला सुरुवात केलेली आहे. जनतेचा पैसा कुठे खर्च केला जातो? याचा हिशोबही कोणी द्यायला तयार नाही. जनतेला धर्माच्या नावाखाली गुरफटून राजकीय नेते मात्र स्वतःची पोळी भाजून घेऊन, जनतेला गुलाम बनवत आहेत. ही वस्तुस्थिती आज बऱ्याच लोकांना कळत आहे. आज चे नेते उद्या राहतील राहणार नाहीत, निवडून येतील येणार नाहीत, हा विषय मुळीच नाही. परंतु यांनी करून ठेवलेली घाण यांनी करून ठेवलेले दूषित वातावरण, यांनी समाजाचा खर्च केलेला पैसा या गोष्टी सुरळीत होण्यासाठी अनेक वर्षांचा कालावधी जाणार आहे. आणि याचा फटका प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष फक्त जनतेलाच बसणार आहे. म्हणून हे असले काय नसले काय तरीही मरण मात्र सर्वसामान्य लोकांचे होत आहे. आणि लोकांच्या मरणावर स्वतःच्या पोळ्या भाजून घेणारे राजकीय नेते टोळी युद्धामध्ये स्वतःचेच वर्चस्व दाखवून आपले वर्तन, नाधर्मानुसार, नाकारमानुसार ना संस्कारानुसार आहे हेच दाखवून देत आहेत. अशा लायक नसलेल्या लोकांना समाजामध्ये खरंच मानाचे स्थान आहे का? आणि ज्यांना मानच नाही अशा लोकांना राजकारण करून काही अर्थ आहे का? हा विषय जरी गंभीर असला तरीही मानसन्मान सोडून हे लोक केवळ स्वतःचे घर भरण्यासाठी राजकारण करत आहेत. आणि स्वतःचे घर भरणे म्हणजे समाजकारण नसते. जनतेचे कल्याण नसते. आणि स्वतःचे घर भरण्यामध्ये कोणी विरोधक बोलत असेल तर त्याचे रूपांतर वैयक्तिक वादातून, राजकीय टोळ्यांची निर्मिती होत आहे. नेत्यांना समाजाची संस्काराची थोडी ही जाणीव असेल, तर त्यांनी राजकीय टोळीयुद्ध बंद करून एकमेकांना खालच्या पाठीवर बोलणे बंद करून, जनतेच्या हिताची कामे हाती घेतले तर जनतेला थोडाफार फायदा होईल. नाहीतर देश अधोगतीकडे चालला हे तर जगाच्या समोर आलेलेच आहे. शेवटी जनतेनेही नेत्यांना प्रश्न विचारून राजकीय टोळी युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्न करावा. तरच आपण जागृत आहोत हे सिद्ध होईल.

# भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये



नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268

आधुनिक केसरी

**जगाच्या पाठीवर '२०५ पेक्षा जास्त देश' आहेत. पण या सर्व देशांचा आणि त्यांच्या राज्यकारभारांचा अभ्यास जेव्हा तुम्ही-आम्ही करायला सुरुवात करतो, तेव्हा भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांचा प्रचंड अभ्यास आणि दूरदृष्टीचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. एक अतिशय 'वैशिष्ट्यपूर्ण' असं लिखित 'संविधान' ह्या खंडप्राय आणि प्रचंड विविधता असलेल्या आपल्या देशाला लाभलेले आहे. भारतीय राज्यघटनेची महत्वाची 'वैशिष्ट्ये' पुढीलप्रमाणे आहेत:-**


**९) एकेरी नागरिकत्व :** भारत हे संघराज्य असुनही भारतीय राज्यघटनेने 'एकेरी नागरिकत्वाचा' स्विकार केलेला आहे. त्यामुळे आपली सर्वांची ओळख आसेतूहिमाचल केवळ भारतीय आणि भारतीयच आहे. यातून आपल्या 'एकतेची' आणि 'एकात्मतेची' भावना अधिक दृढ होते.

**१०) धर्मनिरपेक्ष राज्य :** भारतीय राज्यघटनेने 'निधर्मी राज्याचा' स्विकार केलेला आहे. देशाचा अधिकृत असा कोणताही धर्म नसेल. परंतु राज्य मात्र सर्व धर्मांचा प्रसार-प्रचार आणि विकासासंदर्भात समान तत्त्वांवर काम करेल. कोणत्याही एखाद्या विशिष्ट धर्माला शासनाकडून 'झुकते माप' दिले जाणार नाही.

**११) मतदानाचा अधिकार :** भारतातील सर्व नागरिकांना धर्म, जात, वंश, लिंग, प्रांत, गरीब, श्रीमंत असा कोणताही भेदभाव न करता मतदानाचा अधिकार देण्यात आलेला आहे. 'एक व्यक्ती एक मत' नुसार सर्वांच्या मताला 'समान मुल्य' बहाल करण्यात आलेले आहे. सुरवातीला राज्य घटनेच्या 'अनुच्छेद-३२६' मध्ये वयाची '२१ वर्षं' पुर्ण झालेल्या व्यक्तीला 'मतदानाचा अधिकार' देण्यात आला होता. मात्र १९८९ मध्ये '६१ व्या घटनादुरुस्तीने' हे वय '१८ वर्षं' करण्यात आले.

**१२) त्रिस्तरीय सरकारची स्थापना :**

लोकशाही मुल्य अगदी शेवटच्या व्यक्तीपर्यंत रुजावित, सरकार नेमके कसे काम करते, हे कळावे आणि अगदी गावपातळीवरून देखील 'नेतृत्व' निर्माण व्हावेत, यासाठी त्रिस्तरीय सरकारची स्थापना राज्यघटनेने पुरस्कृत केलेली आहे. 'पंचायत राज, राज्य सरकार व केंद्र सरकार' अशी ही त्रिस्तरीय सरकारची योजना आहे. 'पंचायत राज' यामध्ये 'ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका' यांचा समावेश होतो.




भाग -६

**१३) संसदीय सार्वभौमत्व व न्यायिक सर्वोच्चता यांचे योग्य संतुलन :**

भारतीय राज्य घटनेत 'कायदे मंडळ' व 'न्यायमंडळ' यांच्या अधिकारात योग्य संतुलन निर्माण करण्यात आलेले आहे. संसदेला 'कायदे करण्याचा' तसेच राज्यघटनेत 'घटनादुरुस्ती' देखील करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. याबाबतीत संसद 'सार्वभौम' आहे. मात्र संसदेने केलेले कायदे किंवा घटनादुरुस्त्या ह्या संविधानाच्या चौकटीचे उल्लंघन करणाऱ्या असतील, तर ते 'रद्द' ठरविण्याचा अधिकार मात्र न्यायालयांना आहे. तर, न्यायालयांना देखील संविधानाच्या चौकटीतच निर्णय देणे बंधनकारक आहे.

**१४) आणीबाणी विषयक तरतुदी :** घटनाकारांनी शासन कारभार चालविणे अवघड बनण्याच्या स्थितीची कल्पना करून, अशा आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी आणीबाणीची तरतूद केली आहे. अशी आपत्कालीन परिस्थिती देशाचे सार्वभौमत्व, एकता, अखंडता आणि सुरक्षेस धोका निर्माण करणारी असू शकते. त्यामुळे अशा स्थितीमध्ये देशाची राजकीय 'लोकशाही व्यवस्था व घटना' यांचे संरक्षण करता यावे, यासाठी आणीबाणीच्या तरतुदी घटनेत करण्यात आलेल्या आहेत. आणीबाणीच्या काळात भारतातील संघराज्यांचे अधिकार नष्ट होऊन ते केंद्र सरकारच्या हातात एकटवले जातात. अश्या प्रकारे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण अशी आपली भारतीय राज्यघटना आहे.

**क्रमशः...**

# संस्कारांचे अभेद्य कवच असेल तर प्रभावी फूस निष्प्रभ ठरेल



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**महिला तसंच मुलींच्या संदर्भात प्रसिद्धी माध्यमातून प्रकाशित होणा-या वेगवेगळ्या प्रकरणात फुस लावण्याची आणि पळवुन नेण्याची सध्या जी अवई उठली आहे ती निश्चितच चिंताजनक आहे. सध्या संपत्ती,धन, द्रव्य हि संवर्धन आणि हंस्तातरणाची साधन झाली आहेत. संस्कारावर कोणाचेही लक्ष नाही तशी आवश्यकता पण वाटतं नसेल मात्र परिणाम आपण भोगतोय हे तर वास्तव आहे. आपण एवढं असंस्कारीत का असावं कि आपल्याला सहजगत्या कोणीही फुस लावावी.**

आपण सुसंकृत असु तर जगातील कोणतीही शक्ती आपल्याला भुलवु शकत नाही फुस तर सोडा खुप लहान बाब आहे. पण त्या साठी आपले संस्कार मात्र भक्कम असले पाहिजेत. ज्याचे संस्कारा उत्तम त्याला फुस लावणारा अजुनतरी कोणीही जन्माला आला नाही. मुळात संस्कार कवच मजबूत असेल तर फुस लागतच नाही. प्रयत्न करणारा थकुन जाईल पण यशस्वी होऊ शकत नाही. हल्ली कल्पना करता येणार नाही अशा घटना घडामोडी सामाजिक पातळीवर घडतं आहेत. जबाबदार कोण कारण काय या पेक्षाही अशा घटना का घडतात आणि या पुढे घडणार नाहीत यासाठी काय केलं पाहिजे हे सोडुन आपण आपली जबाबदारी झटकुन मोकळे होतो. आणि अशा घटना फुस लावुन घडतात असं म्हणुन स्वतःची मात्र अलगद सुटका करून घेतो. मुळात फुस लावण्या इतपत आणि आपण बळी पडण्या इतपत आपले संस्कारा दुबळे आहेत का? अगदी ह्रदय हेलावुन जाईल अशा मन सुन्न करणार्या चित्र विचित्र घटना ह्या सगळीकडे कमी जास्त प्रमाणात घडत आहेत आशा घटना घडण हे चुकीचे आहे. पण आपण या मधुन शिकणार कधी मुळात असं का होतं आहे. आपली सामाजिक संस्कृती किती दुबळी झाली आहे. याचा विचार आपण कुठं करणार आहोत कि अजुनही या पेक्षा भयानक आणि भयंकर प्रकाराला सामोरे जाणार आहेत. सध्या पळुण जाण्याचे प्रकार आणि प्रमाण दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात वाढत असल्याने त्यामागिल मुख्य कारण शोधण सुद्धा गरजेचे आहे. वेगवेगळ्या पातळ्यांवर या सगळ्यासाठी फुस जबाबदार ठरते असंच अनेकांना वाटत. पण हे कितपत सत्य आहे. सत्यता असेल तर मग नेमकी फुस म्हणजे काय असते. तर आमिष दाखवून जवळीकता साधणे आणि अंतिमतः फसवणूक होण अथवा फसवण म्हणजे फुस असते. खर पाहिलं तर विचार केला तर हि फुस एका दिवसात खरच लागते का? हो कि अनेक दिवसांची प्रतिक्षा पुर्ण झाल्यानंतर फलस्वरूप परिणाम गडबडले कि त्याच खापर फोडण्यासाठी त्याला सहभागीदाराकडुन फुस असं संबोधलं जातं का? आपण एवढे संस्कारांचे दुबळे आहेत का? कि कोणीही उठाव आणि फुस लावावी हे एवढं सहजगत्या घडत कस हे पण आश्चर्यकारक आहे. कोणीतरी फुस लावली म्हणजे आपण त्याला सहज बळी पडतो. मग आपण किती संस्कार दुबळे आहेत. पण या सगळ्या मध्ये केंद्रस्थानी येतात ते संस्कारच संस्कारांच कवच हेच आपलं रक्षक असत. त्यामुळे जीवनात काही असो नसो पण संस्कार मात्र असले पाहिजे. संस्कारांच अभेद्य कवच असेल तर कोणतीही फुस निष्प्रभ ठरेल. खरंच आपण खुप चाणाक्ष आहेत. पण जिथे चाणाक्ष पाहिजे तिथे आपण जबाबदारी ढकलून मोकळे होतो. आणि नको तिथे आपला चाणाक्ष पणा दाखवतो. मुळात एखाद्या विषयाच खापर कशावर तरी फोडुन आपली जबाबदारी झटकण्यात आपण पटाईत असतो. आपण मुळा पर्यंत कधीच जात नाही एकदा मुळावर घाव घातला तर पुन्हा काहीच उरत नाही. फुस लावुन पळवले याने त्याला पळवले त्याने याला पळवले पळविण्याचे तकलादू कारण काय तर फुस लावली. मुळात फुस का लागते आणि लावली जाते आपले संस्कार कमकुवत झाले तरच फुस लागू शकते. तशी परस्थिती आपण निर्माण होण्यासाठी कारणीभूत ठरत असतो पण आपण सत्य मान्य करत नाही. सत्य मान्य न केल्याने सुधारणा होण्यासाठी चिंतन कसं होईल. संस्कार संस्कृती हि पुन्हा काळाची गरज आहे. संस्कार संस्कृती टिकली मजबूत झाली तर अशा घटना घडामोडी सामाजिक पातळीवर वाढण्याची सुताराम शक्यता नाही. उलट समाज विघातक कृतींना आळा बसेल चाप बसल्याशिवाय राहणार नाही.

# तरूणांनी राजकारण्यांचा काय आदर्श घ्यावा..!



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**आज देशातील राजकारण प्रचंड मोठ्या प्रमाणावर गढूळ झाले आहे. जे राजकारणी सत्तेत आहेत त्यांनी भारतीय संविधानानुसार या देशातील सर्व जनतेची सेवा करणे, त्यांचे कल्याण करणे, त्यांना सुविधा देणे हे त्यांचे आद्य कर्तव्य असते. भारतीय संविधानाला मानवी कल्याण अपेक्षित आहे. त्याप्रमाणे राज्यकर्त्याने वागून देशातील माणसांचे कल्याण व सर्वांगीण विकास साधणे महत्त्वाचे आहे. जनतेने आपल्याला मतदान केले आहे त्या मतदानाला जागून जनतेची सेवा करणे महत्त्वाचे असते. सर्व जातीतील, धर्मातील लोकांना समान न्याय मिळणे हेही अपेक्षित आहे. या देशातील जे विविध धर्म आहेत त्याचे संरक्षण करणे हेही संविधानानुसार देशातील राज्यकर्त्याचे कर्तव्य आहे.**

परंतु आज आपल्या भारत देशात व देशातील काही राज्यांमध्ये विशेषतः महाराष्ट्रामध्येही जाती-धर्माचे राजकारण फार मोठ्या प्रमाणावर बोकाळले आहे. प्रत्येक राजकारणातला सत्तेतील माणूस फक्त विकास नावाचा शब्द वापरतो. वृत्तपत्रातून आणि टीव्हीच्या माध्यमातून जाहिरातीचा नुसता भडीमार करतो. त्या शब्दाच्या भोवती आणि जाहिरातीच्या भोवती सगळ्यांना गुंडाळण्याचा प्रयत्न करतो. वस्तुस्थिती विकासाच्या नावानं जिकडे तिकडे बोंबाबोंब आहे. आज देशात महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, तरुणांच्या हाताला काम नाही, खाजगीकरण,खुन,मारामा-या, दरोडा, बलात्कार, अन्याय, अत्याचार, पक्ष बदलणे, सत्तेचा मलिदा खाण्यासाठी वाटेल ते करणे , खोटे बोलणे अशा अनेक प्रश्नांनी थैमान घातले आहे. याकडे मात्र सत्तेतील प्रत्येक माणूस डोळे झाक करतो आहे. सत्तेतील यासाठी म्हणतो की,तो या सर्व गोष्टींचा बंदोबस्त कायद्याने करू शकतो परंतु तसे होताना दिसत नाही. या महागाईमुळे व इतर समस्यामुळे तर अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होत चालले आहे. केवळ फक्त मंदिर,जात, धर्म, हिंदुत्व,भोंगे, प्रश्न सभा, उत्तर सभा, आंदोलन, यावर राजकारण खेळून आम्ही हिंदुत्वासाठी काम करतो आहोत असे फक्त बोलले जाते आहे. या भारत देशात सर्व विविध जाती धर्मातील लोक राहतात. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. विविध जाती धर्मातील मतदारांनी लोकांना निवडून देऊन राज्यकर्ते बनविले आहे. त्यांनी जातीपातीचा, धर्माचा विचार न करता मतदान केले आहे. तरीही जाती-धर्माचे राजकारण करून सर्वसामान्यांना त्यामध्ये अडकून टाकले जात आहे. त्यांच्या या हिंदुत्वाच्या किंवा जाती-धर्माच्या राजकारणामुळे खेड्यापाड्यात सामान्य माणसाला जगणे अवघड होत चालले आहे. स्वतःने केलेला भ्रष्टाचार व खोटे नाटे लपवण्यासाठी पक्ष बदलणे हेही भयंकर आहे. गाव पातळीवरचा जो माणूस मिळून मिसळून सगळ्यांना बरोबर घेऊन जगण्याचा व गावातील सगळी कामे करण्याचा प्रयत्न करत होता तो माणूस आज टी.व्ही

वरच्या बातम्या ऐकून, राजकीय लोकांचे भाषण ऐकून, एकमेकाबद्दलची राग द्वेषाची भाषा ऐकून फार बिघडला आहे. बिघडत आहे. तोही जाती-धर्माचे राजकारण गावागावात खेळत आहे. भेदाभेद,विषमता निर्माण करत आहे. प्रत्येक माणसाकडे पाहताना प्रत्येक जण एकमेकाकडे दुषित नजरेने पाहत आहे. एकमेकाकडे तो जातीय, धर्मीय नजरेने पाहत आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या मनातील एकमेकाविषयीचा मानवतेचा भाव कमी होत चालला आहे. विषमता वाढत चालली आहे. शाळेमधील लहान मुलंही आत्ता एकमेकांना जात विचारू लागली आहेत. एवढं जातीयतेचं विष या राजकीय लोकांनी व प्रसारमाध्यमांनी भाषणाच्या आणि बातम्यांच्या माध्यमातून पेरलं आहे. ज्याचा परिणाम लहान बालकावर, तरुणांवर, तरुण कार्यकर्त्यावर, शाळा, विद्यालय, महाविद्यालय, कार्यालयांवर होताना दिसतो आहे. एवढेच काय तर विविध कार्यालयात, सामाजिक क्षेत्रात व शैक्षणिक क्षेत्रातही या राजकारणांच्या वागण्या बोलण्याचे लोन पसरले आहे. शासकीय, शैक्षणिक क्षेत्रातील व विविध कार्यालयातील नोकरदार माणुसही प्रचंड मोठ्या प्रमाणावर जातीयतेने वागू लागला आहेत. त्यांच्यामध्ये एक शक्ती संचारत आहे. हे सरकार आमचेच आहे. म्हणून आम्ही कसेही वागलो, काहीही केले, कुणावरही अन्याय अत्याचार केला तरी आमचे कुणीच काही वाकडे करू शकणार नाही. बिघडवू शकणार नाही. अशी उर्मटपणाची, अहंकाराची व अहंपणाची भावना त्यांच्या मनात घर करून बसली आहे. त्यामुळेच समाजातील आपले सामाजिक वातावरण, सामाजिक सलोखा बिघडत चालला आहे. विषमतेचे दरी खोल होत चालली आहे. राजकीय क्षेत्रातील माणसे जशी दादागिरीने वागतात, अरेरावीने वागतात, बिनधास्तपणे शिव्या देतात, एकमेकांची खालच्या पातळीवर जाऊन टिंगल टवाळी करतात, एकमेकाबीशी नको ते अपशब्द वापरतात, महापुरुषांचाही अपमान करतात , खोटे बोलतात या सर्वांचा परिणाम आमच्या तरुणावर म्हणजे देशाच्या भावी नागरिकांवर होताना दिसतो आहे. अधिकारी, कार्यकर्तेही तसेच वागू लागले आहेत. सामाजिक क्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात व विविध कार्यालयात नीतिमता, मानवता कुठेही राहिलेली दिसून येत नाही. एवढेच काय तर चांगल्या अधिकाऱ्यांना, चांगल्या कार्यकर्त्यांना, चांगल्या तरुणांना, चांगल्या समाज कार्य करणाऱ्यांना समाजात काम करणे अवघड झाले आहे. कारण राजकीय क्षेत्रातील अनेक अभद्र वागणाऱ्या माणसांचे, मंत्र्यांचे संस्कार तरुणावर व कार्यकर्त्यावर झालेले असल्यामुळे ते चांगल्यांना काम करू देत नाहीत. चांगला काम करणारा माणूस दबून चालला आहे नवे त्याला प्रचंड दाबून टाकले जात आहे. जाती जातीवर, धर्मा धर्मावर लोक एकत्र येत आहेत. हेच खऱ्या अर्थाने देशाला धोकादायक आहे. त्यामुळे भारतीय लोकशाहीला धोका पोहोचत आहे. म्हणून राजकीय सत्तेत असणाऱ्या किंवा सत्तेत नसणाऱ्या विविध पक्षातील राजकारण करणाऱ्यां कार्यकर्त्यांनी, अधिकाऱ्यांनी, बोलताना प्रत्येक शब्द काळजीपूर्वक वापरायला हवा. शब्द हे शस्त्र आहे हे लक्षात ठेवूनच जपून वापरणे गरजेचे आहे. खरे तर हे सर्व टी.व्हीवर पाहिल्यानंतर राजकारणातील माणसं किती खालच्या स्तरावर जाऊन पोहोचतात हे दिसून येते. हे खरे तर लाजिरवाणी गोष्ट आहे. अनेकांना खाली मान घालायला लावणारी गोष्ट आहे. देशाची अस्मिता नष्ट करणारी गोष्ट आहे. हे प्रत्येकाने लक्षात ठेवून वागायला हवे. नीटनेटकेपणा, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवेदनशीलता, राष्ट्रहित, देशहित, राष्ट्रीय एकात्मता, स्वातंत्र्य,समता,बंधुता आणि न्याय ह्या अशा अनेक जीवनमूल्यांची पेरणी या राजकारणात काम करणाऱ्या राज्यकर्त्यांच्या व इतर प्रशासकीय क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक माणसांच्या कृतीतून, आचरणातून आणि वाणीतून व्हायला हवी. तरच देशातील शैक्षणिक क्षेत्रातील तरुणावर ,समाजातील विविध तरूण कार्यकर्त्यावर संस्कार रूजतील आणि देश महासत्ता होण्याकडे वाटचाल करील. आपले वागणे, बोलणे आणि कृती हे निश्चितच इतरावर छाप पाडेल, प्रभावित करेल असे प्रत्येकाने असायला हवे. हे सतत त्यांनी ध्यानात ठेवायला हवे. संस्कार हे मानवी जीवनाला आकार देणारे, घडवणारे असतात. संस्कारावरच तरुणांचे जीवन अवलंबून असते. संस्कारामुळे तरुणांचा कायापालट होऊन मानवी जीवन सुखमय बनण्यास मदत होत असते. संस्कारशील तरुणामुळे व विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या माणसामुळेच देशाची उंचीही वाढत असते. पाणी वरून खाली झिरपत असते अगदी त्याचप्रमाणे संस्कारही मोठ्यांकडून लहानाकडे येत असतात. हे प्रत्येकानेच कायम लक्षात ठेवायला हवे. यातच देशाचे सौख्य सामावले आहे.पण आजचे जे सामाजिक, राजकीय, आर्थिक, वैचारिक, शैक्षणिक, कौटुंबिक, नैतिक वातावरण आहे ते प्रचंड गढूळ झालेले आहे.त्यामुळे प्रत्येकाने प्रयत्न करून ते स्वच्छ करणे गरजेचे आहे. आपली भूमिका आपले विचार हे रास्त असायला हवेत. सत्य असायला हवेत. ते इतरांना दिशा देणारे असायला हवेत. हे प्रत्येकाला वाटायला हवे. आज कुणालाच कुणाचा धाक राहिलेला दिसत नाही. कायद्याचा धाक तर कुठेच दिसत नाही. कायद्याची अंमलबजावणी करणारेही अनेक ठिकाणी मूग गिळून बसलेले दिसतात. कायद्याची योग्य आणि कडक अंमलबजावणी होताना दिसत नाही. त्यामुळेच प्रत्येक माणूस मग तो समाजातील असो,कार्यालयातील असो किंवा राजकारणातील असो त्याला जसे वाटेल तसे तो वागताना दिसत आहे. सामान्य जनतेच्या कामाला, तक्रारीला केराची टोपली दाखवली जाते. अनेक तक्रारी करून करून सामान्य माणूस दमून जातो. तरी कुठलाच अधिकारी , मंत्रालयातील मंत्री, पोलीस क्षेत्रातील अधिकारी कुणीही कुणाची दखल घेताना दिसत नाही.

अधिकाऱ्यांचाही धाक राहिलेला दिसत नाही. म्हणूनच की काय अनेकजण बोगस नोकरी करताना व अनेक बोगस कामे, भ्रष्टाचार करताना दिसतात. अशांनाच अधिकारीही आर्थिकतेच्या जोरावर पाठिंबा देताना दिसतात व तशी केस दाबून टाकतात. उलट न्याय मागणाऱ्याच्या पाठीमागे लागतात व त्याच्यावरच खोटी केस करून त्याला संपवून टाकतात. नामोहरम करतात. हे सारे वाईट चालू आहे. मानव हिताचे ते अजिबात नाही. ह्या साऱ्या गोष्टी लक्षात घेऊन राजकारणातील व इतर विविध क्षेत्रातील कुणीही असो किंवा तो कुठल्याही पक्षातील असो त्याने मात्र चांगलेच वागणे, चांगलेच खरे कामे करणे, न्याय मिळवून देणे, कुणावरही अन्याय अत्याचार होणार नाही, जातीय धर्मीय भावना भडकणार नाही असे वागणे महत्त्वाचे आहे त्यातच समाजाचे व देशाचे भले आहे. तीच खरी राष्ट्रीय एकात्मता आहे. तेच संस्कार घेऊन आजचा तरुण निश्चितच देशाचे भवितव्य घडविल्याशिवाय राहणार नाही.

# 'अल्ट्रा झकास' मराठी ओटीटीवर!

आधुनिक केसरी

**हिंदी, मराठीसह प्रादेशिक तसेच विदेशी मनोरंजन क्षेत्रात आपला प्रभाव निर्माण करणाऱ्या 'अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट'ने नुकतेच 'अल्ट्रा झकास' हे मराठी ओटीटी सुरु करून अल्पावधीतच प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवायला सुरुवात केली आहे. अवघ्या काही दिवसांत जगभरात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या 'अल्ट्रा झकास' या मराठी ओटीटीने प्रेक्षकांच्या मनात मानाचं स्थान मिळवलं आहे. प्रत्येक आठवड्याला नवीन आणि झकास कन्टेंट प्रेक्षकांच्या भेटीला आणणार असल्याचा शब्द 'अल्ट्रा झकास'ने पाळला आहे.**

'अदृश्य' रहस्याचा शोध घेण्यासाठी रितेश देशमुख, पुष्कर जोग, मंजिरी फडणीस 'अल्ट्रा झकास' मराठी ओटीटीवर! *

*१५ मे रोजी 'अल्ट्रा झकास' मराठी ओटीटीवर 'एक्स्क्लुझिव 'वर्ल्ड डिजिटल प्रीमियर'! *

'रौद्र', 'कुलस्वामिनी', 'इरुल-रात्र अंधारी', 'बोल हरी बोल' आणि 'थरार प्रेमाचा-अथिरन'नंतर 'अदृश्य' या मल्टीस्टारर चित्रपटाच्या डिजिटल प्रीमियरची घोषणा करत आहेत. १५ मेपासून अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर या चित्रपटातील रहस्य्यांचा उलगडा होणार आहे. ग्लॅमरस अभिनेत्री मंजरी फडणीस, हॅण्डसम हंक पुष्कर जोग, सौरभ गोखले, उषा नाडकर्णी, अनंत जोग आणि सुपरस्टार रितेश देशमुख यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या 'अदृश्य' या रोमांचक रहस्यमय चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा 'ताल', 'परदेस', 'कहो ना प्यार है', 'वेल कम बॅक' यांसारख्या गाजलेल्या चित्रपटांचे प्रख्यात सिनेमॅटोग्राफर कबीर लाल यांनी सांभाळली आहे. प्रोग्रेसिव्ह ब्लाइंडनेसने आजारी असणाऱ्या सायलीचा मृत्यू होतो. तर, सायलीची जुळी बहिण असणारी सानिका आपल्या बहिणीच्या मृत्यूमागचं गूढ शोधण्यासाठी प्रयत्न करते. सायलीचा मृत्यू ही, 'हत्या की आत्महत्या' हा प्रश्न तिला शांत बसू देतं नाही. या शोधमोहिमेत अदृश्य 'व्यक्ती' की अदृश्य 'उत्तर' हा प्रश्न एका रोमांचक वळणार घेऊन येतो. "कलाकारांची उत्तम फळी लाभलेला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आणताना आम्हाला आनंद होत आहे. शिवाय, चित्रपटाची रहस्यांनी आणि थराराने परिपूर्ण कथा प्रेक्षकांना आवडेल असा विश्वास वाटतो. शिवाय, समीक्षकांच्या कौतुकाचा वर्षाव झालेला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आणताना आम्हाला आनंद होत आहे. 'अल्ट्रा झकास'च्या रुपात जगभरातील मराठी रसिक प्रेक्षकांपर्यंत 'मराठी मनोरंजन' पोहोचण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत." अशी प्रतिक्रिया अल्ट्रा मीडिया आणि एंटरटेनमेंट प्रा. लि.चे एमडी आणि सीईओ सुशीलकुमार अग्रवाल यांनी व्यक्त केली आहे.

दोन हजार तासांपेक्षा अधिक तासांचा कन्टेंट उपलब्ध असणाऱ्या 'अल्ट्रा झकास'वर मराठी भाषेत डब केलेले दाक्षिणात्य आणि हॉलीवूडच्या चित्रपटांबरोबरच, जुने आयकॉनीक मराठी चित्रपट आणि विविध विषयांवरील वेब सीरिज, किड्स ॲनिमेश, वेब-शो असा मनोरंजनाचा खजिना उपलब्ध आहे. 'अल्ट्रा झकास' हा ओटीटी अँड्रॉइड वापरकर्त्यांसाठी प्ले-स्टोअर आणि ॲपल वापरकर्त्यांसाठी ॲप-स्टोअरवर डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. ॲप डाउनलोड केल्यानंतर आपल्या आवडीनुसार सबस्क्रिप्शन घेऊन तुम्हाला 'अल्ट्रा झकास'वरच्या झकास कन्टेंटचा आनंद घेता येणार आहे. ५९ रुपयांत मासिक, १४९ रुपयांत तीन महिन्यांसाठी आणि २९९ रुपयाच्या सवलतीच्या दरात वार्षिक सबस्क्रिप्शन असणार आहे. अधिक माहितीसाठी www.ultrajhakaas.com ला भेट द्या. अदृश्य रहस्याची उकल करण्यासाठी लगेच डाउनलोड करा 'अल्ट्रा झकास ओटीटी' ॲप आणि तुमच्या कुटुंबासोबत अमर्याद आनंद घ्या अल्ट्रा झकास वरील एचडी कन्टेंटचा.




# गर्भाशय आहे म्हणोनी !

आधुनिक केसरी

त्या मिठीत दोघांच्या ह्रदयात काय खळबळ व्हायची हे फक्त आम्हा दोघांना कळायचं. काही दिवसांनी मात्र कबीर इतका मुलांमध्ये रूळला, खेळायचा की संध्याकाळी लगेच येऊ नको घ्यायला.अजून एक तासाने ये, म्हणायचा. हा इतिहास झटकन माझ्या डोळ्यासमोरून तरळून गेला. ) मग त्या ताईंनी सांगायला सुरुवात केली, सहा महिन्याचा असल्यापासून आहे इथे तो. आम्ही कितीही प्रेम लावलं तरी आईची जागा घेऊ शकत नाही. बिचारा सकाळी आठला येतो आणि साडे सातला जातो. किती वेळ सोबत असेल आईच्या ? तास दोन तास रात्री तेवढं. तेही रात्री गेल्यावर तिला स्वयंपाक करायचा असतो. काय प्रेम मिळणार लेकराला ? त्याच्या आईचा आता नववा महिना सुरू आहे. हे लेकरू अजून किती लहान आहे, तोवर दुसरे. काय करणार ? मी त्या पिल्लाकडे पाहून हसले आणि चेहरा हाताने लपवला, परत हात काढले. लेकरू खुदकन हसलं, भिंतीआड झालं, परत डोकावलं. आम्ही दोन मिनिट खेळलो. ते पिल्लू मग त्या ताईंच्या मांडीवर येऊन बसलं. ताईंनी त्याच्या अंगावरून हात फिरवला. बोलता येत नाही अजून, फक्त मम्मी मम्मी करतो. आईला उशीर झाला रे आज, त्याच्याकडे पाहून ताई म्हणाल्या. त्याला कळलं त्या काय म्हणत होत्या ते. थोड्या वेळात त्याची आई आली. पिल्लू लगबगीने उठून आईकडे पळालं. आईला पप्पी घ्यायची होती पण वाकू शकत नव्हती. पिल्लू लगेच परत पळालं. सॅंडल आणायला. घाईघाईत सॅंडल चढवले. पिशवी घेतली आणि हसून आईचा हात धरला. त्याची आई त्याला बघून आनंदून हसली. भरपूर पोट बाहेर आलेलं. उंचीने कमी असल्याने पोट आणखीनच मोठं दिसत होते. मंत्रालयाकडे गेले होते, मीटिंग होती म्हणून उशीर झाला. लांब आहे ना ते, उशीरच होतो यायला, हसून अगतिकतेने बोलली. सुट्टी कधी घेताय ? सुट्टी टाकली आहे, पण त्यांनी अजून मंजूर केली नाही. सहा महिने कोण काम करणार म्हणत आहेत. सुट्टी कमी कर म्हणतात. कशी करू कमी ? मी, अहो, त्यांनी सुट्टी मंजूर केली नाही तरी तुम्ही जाऊ



लक्ष्मी यादव, मुंबई, मो. 98337 95533

शकता आणि सहा महिने तर सुट्टी घ्याच आणि गरज पडली तर त्यांनी वाढवून द्यायला हवी. पिटूकल्याने हात पकडला आणि बाहेर खेचू लागला. त्याला त्याने घेतलेली बॅग आवरत नव्हती, पण तो आईकडे देत नव्हता. मी घ्यायचा प्रयत्न केला, दिली नाही. बॅग जड होती, त्याच्या मानाने तर जास्तच. "रोजच असा करतो, देत नाही बॅग. वरून बाहेर पडलं की थांब म्हणतो, गाडी आली आहे." आम्ही गप्पा मारू लागलो. आता इथून कुठे ? कसं जाणार ? रिक्षाने, आग्रोली गाव. पिल्लू लहान आहे अजून. दुसरा चान्स जरा लवकर घेतला. हो ना. लवकर राहिलं. कसंनुसं हसत ती म्हणाली. "स्वयंपाकाला मदत घ्यायची ना ? तुम्हाला आरामाची आणि मुलांसोबत वेळ घालवायची गरज आहे. जीवाला सुख लागावं म्हणूनच आपण पैसे कमावतो ना ? हो ना. आता डिलीव्हरीवरून आल्यावर बघेनं." बरचसं मोठालं काही तरी सावरत ती म्हणाली. आई पिल्लुला बॅग मागत होती, ते द्यायला तयार नव्हतं. तसंच सांडत, लवंडत, हेंडकाळत, डुलत आईबरोबर गेकडील उजेडाच्या दिशेनं तिचा हात हातात घेऊन चालत गेलं. त्याला कदाचित आईच्या पोटातील बाळाच्या, तिच्या खांद्यावरील पिशवीच्या आणि तिच्यावर असणाऱ्या सर्व जबाबदारीच्या ओझ्याची जाणीव असेल. आपण आपली बॅग घेऊन तिचं थोडं ओझं कमी करुया असा विचार ते पिल्लू करत असावं. **क्रमश :**

# वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** मंगळवार रोजी बसस्थानकावर मातृभूमीच्या रक्षणासाठी प्राणा अर्पण इतिहासातील एक महान योध्दा वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची ४८३ वी जयंती साजरी करण्यात आली. वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव सुनील गुजर, दिनेश हजारी व पत्रकार संघटनेचे तालुका अध्यक्ष भरत पगारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण यांच्या हस्ते करण्यात आले.तदनंतर उपस्थित मान्यवर पंकज परदेशी,अमोल निकम पूनम परदेशी, पत्रकार रवींद्र काटोले, भगवान पंडित व वाय डी बोखारे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. इत्यादी उपस्थित मान्यवरांच्या हातून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पत्रकार संघटनेचे तालुका अध्यक्ष भरत पगारे यांनी वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला महाराणा प्रतापसिंह महान योद्धा होते यांचा जन्म राजस्थानमधील मेवाड मधील राजपूत कुटुंबात 9 मे 1540 रोजी झाला त्यांच्या पराक्रमाच्या गाथेला भारतभूमीला अभिमान आहे. महाराणा प्रताप सिंह मेवाडच्या लोकांचे राणा होते सध्या हे ठिकाण राजस्थानमध्ये आहे. ते एक शूर योद्धा होते ज्याने प्रत्येक परिस्थितीत शेवटच्या श्वासापर्यंत आपल्या प्रजेचे रक्षण केले त्यांनी नेहमीच स्वतःच्या आणि कुटुंबातील लोकांचा आदर केला. आपली वीरता हुशारी आणि धाडसासाठी ओळखल्या जाणाऱ्या महाराणा प्रताप यांचे नाव इतिहासाच्या पानावर कोरले गेले राष्ट्रवीर राणा प्रतापसिंह यांच्या शौर्यगाथा समाजापुढे मांडण्याची व समाजाने त्यांच्या अनुकरण करण्याची गरज व्यक्त केली असे विचार मनोगत पत्रकार भरत पगारे यांनी मांडले यावेळी पत्रकार सुनील काळे, विजय काळे, एसटी कर्मचारी, मान्यवर इत्यादी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# तर पंधरा हजार गायींचे वाटप करणार

## आ. प्रशांत बंब : मतदारसंघातील तरुणांनी साथ दिली

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबादचे आमदार प्रशांत बंब यांच्या संकल्पनेतून रेल्वेराज्यमंत्री रावसाहेब दानवे, अर्थराज्यमंत्री भागवत कराड,मा.विधानसभा अद्यक्ष हरिभाऊ बागडे यांच्या शुभहस्ते खुलताबाद तालुक्यातील धामणगाव येथे खुलताबाद तालुक्यातील 75 गरजू तरुणांना 150 होलस्टन जातीच्या दुधाळ गायीचे वाटप आज करण्यात आले. सर्वप्रथम केंद्रीय रेल्वेराज्यमंत्री रावसाहेब दानवे, अर्थराज्यमंत्री भागवत कराड, विधानसभा अद्यक्ष हरिभाऊ बागडे, आ. प्रशांत बंब यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले सर्वप्रथम ना.कराड यांनी बोलताना सांगितले कीं आ. प्रशांत बंब यांच्या मतदारसंघातील जनतेसाठी ज्या नावीन्यपूर्ण योजना राबविल्या जातात त्या शंभर टक्के यशस्वी आमदार बंब यांच्याकडून केल्या जातात. तसाच अभिनव दुधाळ गायीचा गीताबन प्रकल्प यशस्वी होईल यात शंका नाही मात्र अर्थराज्यमंत्री म्हणुन जीकाहि मदत लागेल ती सर्वोतोपारी केली जाईल असेही सांगितले तर रावसाहेब दानवे म्हणाले कीं आ. बंब यांनी जी संकल्पना शेतकऱ्यांचा मुलांसाठी राबवली आहे ती कौतुकास्पद असून लाभार्थी युवकांनी सचोटीने प्रयत्न करून दुधउत्पादन करून कुटुंबांचा चरितार्थ चालवावा व अधिकाधिक गायी वाढून कुटुंबालाही दूध व्यवसायात झोकून द्यायला हवे असे सांगितले तर कार्यक्रमाचे आभार विनोद पाटील यांनी मानले दरम्यान याठिकाणी ज्या गायी आणल्या आहेत त्या 90 टक्के व्याल्या असल्याने याच दुधाची बासुंदी उपस्थिताना भोजणात देण्यात आली यावेळी केंद्रीय मंत्री महोदयांनी स्टेजवरच भोजनाचा आनंद घेतला आमदार बंब यांनी बोलताना सांगितले कीं दिवाळीपर्यंत आम्ही युवकांना 1500 गायीचे वाटप करणार असून 15 आगस्टला 300 गायी गंगापूर तालुक्यातील शेतकरी पुत्रांना वाटप करणार आहे मतदारसंघातील तरुणांनी साथ दिली तर पंधराशे नाही तर पंधरा हजार दुधाळ गायीचें वाटप करणार असल्याचेही आमदार प्रशांत बंब यांनी सांगितले यावेळी आमदार बंब यांचे व्याही तथा राहता तालुक्याचे माजी नगराध्यक्ष राजेंद्र पिपाडा, जावई यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# मल्लिकार्जुन खरगे यांना जीवे मारण्याची धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे व त्यांच्या परिवारांना जीवे मारण्याच्या धमकी निषेधार्थ आज लोणार तालुका व शहर काँग्रेस कमेटीच्या वतीने पोलीस स्टेशन लोणारला निवेदन देण्यात आले. काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लीकार्जुन खर्गे यांना व त्यांच्या परिवाराला गैरअर्जदार मानिकांता राठोड यांच्याकडून जिवे मारुन टाकण्याबाबतच्या धमकीचा आडियोक्लिप सोशल मीडियाव्दारे व्हायरल झाला. सदर ऑडीओ क्लीपमध्ये चित्तापूर विधानसभा मतदार संघाचे भाजप उमेदवार मानिकांता राठोड व अन्य एका अज्ञात व्यक्तीसोबत मिळुन संगणमताने काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लीकार्जुन खर्गे यांना व त्यांच्या परिवाराला जिवे मारण्याची संपवून टाकण्याची धमकी देताना व कट कारस्थान करतांना आढळून येत आहेत. मल्लिकार्जुन खर्गे हे आमच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असल्याने त्यांना व




त्यांच्या परिवाराला गैरअर्जदाराकडून जिवे मारण्याचे कट कारस्थान रचणे म्हणजेच एक प्रकारे काँग्रेस पक्षाच्या नेत्यांना व पदाधिकाऱ्यांना धोका होण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे सदरील गुन्हा हा गंभीर दखलपात्र व आजामीनपात्र स्वरुपाचा आहे. तसेच देशाच्या प्रमुख विरोधी पक्षांच्या अध्यक्ष स्थानी असणाऱ्या व्यक्तीला जिवे मारण्याची धमकी देणे, हा प्रकार अतिशय गंभीर स्वरुपाचा आहे. तेव्हा सदर प्रकरणात भादंवि कलम 120 ब,504 व 506 अंतर्गत भारतीय जनता पक्षाच्या चित्तापुर मतदार संघाचा अधिकृत उमेदवार नामे माणिकांता राठोड व अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा नोंदवून सदर आता अटक करण्यात यावी.मा. सर्वोच्च न्यायालयाने ललिता कुमारी विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार व ईतर ( WRITE PETI- TION ) ( CRIMINAL ) 68 OF 2018 ) या खटल्यात दिलेल्या न्यायनिवाड्यानुसार दखलपात्र अजामीनपात्र गुन्हयात FIR दाखल करून घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे सदर प्रकरणांत FIR. दाखल करून सदर आरोपांना त्वरीत अटक करण्यांत यावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी राजेश मापारी तालुका अध्यक्ष काँग्रेस कमिटी, शहराध्यक्ष शेख समद शेख अहमद, महाराष्ट्र प्रदेश सेवा दलाचे नेते प्रकाश धुमाळ, साहेबराव पाटोळे, शांतीलाल गुगलीया, प्राध्यापक गजानन खरात, अनिकेत मापारी, भूषण मापारी, तोफिक कुरेशी शिवसेना उद्धव गटाचे शहर प्रमुख गजानन जाधव,नगरसेवक शेख रहुफ भाई, ओबीसी सेल शहराध्यक्ष अंबादास इंगळे, माजी नगरसेवक प्राध्यापक सुदन कांबळे, नगरसेवक शेख असलम शेख कासम, माजी नगरसेवक पंढरी चाटे, गजानन मापारी, माजी नगरसेवक,शाम राऊत, संजय काशीराम जाधव, आप्पा शिंदे, एन एस यु आय चे सरचिटणीस शेख जुनेद शेख करामत, शेख जुबेर चौधरी, शेख अखिल मुल्लाजी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा कोषाध्यक्षपदी देवराव आहेर यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना महाराष्ट्रराज्य जिल्हा कोषाध्यक्षपदी देवराव आहेर पाटील रा.मुमराबाद ता. खुलताबाद यांची निवड पत्र जिल्हा अध्यक्ष काशिनाथ जाधव छत्रपती संभाजीनगर शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना यांनी दिले संभाजीनगर जिल्हा शरद जोशी विचार म्हणजे शेतकरी संघटना महाराष्ट्रराज्य या संघटने विषयी असलेली आपली निष्ठा व आपली कार्य करण्याची क्षमता संघटना बळकटीसाठी व मजबूत करण्यासाठी तसेच संघटनेचे ध्येयधोरणे संघटनेचे शेतकरी संघटनेच्या सर्व सामान्य पर्यंत पोहोचण्यासाठी शेतकऱ्यांच्या हितासाठी आपले सहकार्य राहील असा विश्वास जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव पाटील यांनी दिला संभाजीनगर जिल्हा अध्यक्षपदी देवराव आहेर पाटील जिल्हाभर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# कन्नडमध्ये गुटख्याची लाखो रूपयांची उलाढाल

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरात तसेच तालुक्यात लाखो रूपयाची उलाढाल होत असुन कन्नडमध्ये बस्टॉप , छाजेडनगर, नगरपरिषद, जवळ चिकलठान, कुंजखेडा, चापानेर, पिशोर इत्यादी ठिकांनी मोठे मोठे व्यापारी पोतेचे पोते आपआपल्या सोई नुसार गुटखा सारखे आमली पदार्थाचा मोठा साठा साठवून ठेवून चढ्या भावाने विकत आहे व त्यांनी गुटखा विकण्यासाठी छोटे छोटे कमिशनवर व्यावसाईक तयार केले. ते शहरात व तालुक्यात बिनधास्त मोटारसाकलवर गुटख्याचे पोते घेऊन फिरतात. याकडे अन्न औषध प्रशासनाचे अधिकारी दुर्लक्ष करताना दिसून येत आहेत. आत्तापर्यत एकही कारवाई नाही. मागे कन्नड मध्ये दुसऱ्या विभागाने कारवाई केली होती परंतु अन्न औषध प्रशासनाची एक ही कारवाई नाही. यात नेमके गोडबंगाल आहे तरी काय असा प्रश्न या ठिकानी उपस्थीत होत आहे. हा गुटखा रात्री अपरात्र शहरात येतो रातोरात गुटख्या आपआपल्या सोईनुसार शहराबाहेर गोल्डावूनमध्ये लपवण्यात येतो. गुटखा शरीरासाठी हानिकारक असून आता लहान लहान मुलांमध्ये गुटखा खाण्याची फॅशन झाली आहे. या व्यसनाला अधीन करण्यासाठी जबाबदार गुटखा विक्रेतेवर कठोर कारवाई करावी असे ही बोलले जात आहे. यावर अन्न प्रशासन काय ठोस पाऊले उचलतात याकडे नागरीकांचे लक्ष लागले आहे .






# तळणी ते देवठाणा रस्त्याचे डांबर व सिमेंट रस्त्याचे बांधकाम बोगस

## कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांना बडतर्फ करा

आधुनिक केसरी न्यूज

**मंठा :** जिल्हाधिकारी जालना दिनांक, ६ मे २०२३



रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदन देऊन तक्रार करण्यात आली निवेदनात पुढे म्हटले आहे कि जालना जिल्ह्यातील तालुका मंठा सार्वजनिक बांधकाम उपविभाग मंठा कार्यालय अंतर्गत तळणी ते देवठाणा या ५ किलोमीटरचे काम सध्या प्रगती पथावर असले तरी या कामाकडे सार्वजनीक बांधकांम विभागाच्या कृपा आशीर्वादाने संबंधीत ठेकेदाराचे फावत आहे चार ते पाच किलोमीटर च्या रोडवर काही भाग हा सीमेन्ट काँक्रीट चा असून संबंधीत ठेकेदाराने काळी माती खोदून सिमेन्ट चे बेड करणे गरजेचे असताना सुधा सरळ सरळ खडीवरच सिमेन्ट काँक्रीटचा माती मिश्रीत माल अथरण्यात येत असून माती मिश्रीत वाळू व खडीचा वापर होत असल्याने रस्ता गुणवत्तापूर्वक होत नाही गेल्या अनेक दिवसापासून या रोडच्या सुधारण्यासाठी ग्रामस्थाचा पाठपूरावा सुरु होता शासनाकडून ४ कोटीपेक्षा अधिक निधी या रस्त्यासाठी उपलब्ध झाला तरी निधी च्या तुलनेत तितक्या गुणवतेचे काम या रोडचे होत नसल्याने या कामावरील कार्यकारी अभियंता श्री कांडलिकर क्रमांक २ जालना, उप अभियंता मंठा श्री नेवरे, कनिष्ठ अभियंता श्री भगवान शिंदे याची चौकशी करून त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी पूढे येत वास्तवीक पाहता एवढया मोठया प्रमाणात निधी उपलब्ध असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचा अभियंता उप अभियंता यानी या कामावर हजर राहणे गरजेचे असताना सुध्दा ठेकेदाराची मेहरबानी राखण्यासाठी संबधीत आधिकारी या कामाकडे साफ दुर्लक्ष करत असल्याने ठेकदाराची मनमानी होत असल्याने या रोडच्या नित्कृष्ट दर्जाचे होणाऱ्या कामा सदर्भात सार्वजनिक बांधकाम उपविभाग मंठा येथे कार्यरत असलेले मास्टरमाईंड भ्रष्टाचाराचे जनक कनिष्ठ अभियंता भगवान शिंदे यांना बोगस कामाबाबत काही पत्रकारांनी चौकशी केली असता त्यांना धमक्या वजा उलटे मार्गदर्शन केले, पत्रकारांनी विचारले हे काम कालच बंद करुन आलो आहे, संबंधित काम करणारी एजन्सी माझे ऐकत नाही, तुम्हाला काय करायचे ते खुशाल बातमी लावा माझी काही काही वाकडे होत नाही. माझ्यासोबत माझे कार्यकारी अभियंता आहेत, म्हणून तळणी ते देवठाणा या रस्त्यावर ४ कोटी रुपये शासनाचा निधी खर्च करणाऱ्या होत आहे. एजन्सीने कार्यकारी अभियंता उप अभियंता मास्टरमाईंड कनिष्ठ अभियंता त्यांना बडतर्फ करून एजन्सी कडून नव्याने काम करून घ्यावे यासाठी कठोर कारवाई करावी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची अपेक्षा आहे. कारण जालना जिल्ह्यातील तालुका मंठा येथील तळणी ते देवठाणा ४ किलोमीटरच्या या कामासाठी ४ कोटी रुपये शासनांने मंजूर आहे, या रस्त्याचे कोणतेही जुने मटेरियल खोदकाम न करता सिमेंट रस्ता नवीन निर्माण करायचा उद्योग केल्यामुळे रस्त्याला तडे जात आहेत,याच रोडवर काही जागावर काळी मातीच्या ठिकाणी सिमेन्ट रोडचे काम होणार असून या कामासाठी मातीमिश्रीत वाळू नित्कृष्ट दर्जाची खडी व इतर बोगस साहीत्याचा वापर होत आहे, वाळू लिलावा प्रक्रिया बंद असताना या कामासाठी रेती वढ्याची वापरली या सिमेन्ट रस्त्यासाठी शेकडो ब्रास लागणारी वाळू नेमकी आली कोठून महसूल विभागाला या ठिकाणी पडलेले वाळूचे मोठे मोठे साठे दिसले कसे नाही. सर्वसामान्य माणसाला घरकूल बांधकाम साठी वाळू मिळेनासी झाली आणि या रोड साठी शेकडो ब्रास वाळू उपलब्ध होती कशी ? रोडच्या सदर्भात तळणी देवठाणा ग्रामस्थानी अनेक वेळा या कामाचे उपअभियंता व कनिष्ठ अभियंता शिंदे याच्याकडे सरपंच तळणी गौतम सदावर्ते यांनी तक्रारी केल्या आहेत, कोणतीही दखल न घेता या तक्रारी कडे दुर्लक्षित करून तळणी ते देवठाणा या बोगस रस्त्याच्या कामाला सहकार्य केले म्हणून दि, २७/५/२०२३ रोजी मा. मुख्यमंत्री मंत्रालय मुंबई कार्यालयाकडे तक्रार केली होती अद्याप हि कारवाई झाली नाही, म्हणून संबंधित कार्यकारी अभियंता क्रमांक २ जालना, उप अभियंता नेवरे,या कामावर देखरेख करणारे कनिष्ठ अभियंता भगवान शिंदे, तसेच कामाची प्रत गुणवत्ता अधिकारी या दोषी अधिकारी यांना बडतर्फची कारवाई करून, या ४ कोटी रुपयाचे काम करणाऱ्या एजन्सीला बिल देऊ नये म्हणून कारवाई करण्यात यावी.

# पिलीव येथे महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**माळशिरस :** तालुक्यातील पिलीव येथे महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी झाली. सालाबादप्रमाणे विरशैव लिंगायात समाजातर्फे पिलिवमध्ये महात्मा बसवेश्वर जयती मोठ्या थाटामाटात साजरी झाली. जयंतीचे औचित्य साधून सकाळी विरशैव लिंगायात समजाने राजस्तरीय वधू - वर परिचय मेळावा घेतला होता.

सायंकाळी माढेकर महाराज आणि शिंगणापूर कर महाराज यांचे प्रवचन,सुहास उरवणे यांचे महात्मा बसवेश्वर यांच्या वरील व्याख्यान व अध्यक्षीय भाषण झाले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून पालकमंत्री तथा विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख, तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना नेते भाऊसाहेब आंधळकर उपस्थित होते. यावेळी विरशैव लिंगायात समाजाचे अध्यक्ष शुभजीत नष्टे, उपाध्यक्ष ऋषिकेश देशमुख, सचिव गणेश देशमुख, महात्मा बसवेश्वर जयती उत्सव समितीचे अध्यक्ष संकेत देशमुख, अमोल नष्टे,विनायक आर्वे, सुहास कोल्हे, चंद्रकांत धसाडे, शिवम घोंगडे, प्रथमेश घोंगडे, आरव जेऊरकर, यश उरवणे यांनी परिश्रम घेऊन जयंती पार पाडली. यावेळी आ. विजयकुमार देशमुख, शिवसेना नेते भाऊसाहेब आंधळकर, विरशैव लिंगायात समाजाचे अध्यक्ष शुभजीत नष्टे, माजी उपसरपंच नानासाहेब देशमुख, अविनाश जेऊरकर, अशोकभाऊ घोंगडे,उमेश देशमुख, कल्याण नष्टे, सुरेश घोंगडे विजय सगरे, नामदेवराव देशमुख, वैभव मेथवडे,बंडू स्वामी, भाऊ स्वामी, महादेव शेटे गुरुजीव समजातील अन्य मान्यवर उपस्थित होते.






# टाटानगर एक्सप्रेस रद्द, दुरान्तोसह अनेक गाड्यांना विलंब

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** दक्षिण-पूर्व रेल्वेच्या चक्रधरपूर विभागात ११ ते १३ मे दरम्यान काम करण्यात येत असल्याने हावडा-मुंबई मार्गावरील गाड्यांवर परिणाम झाला आहे. काही गाड्या रद्द तर काही गाड्यांना विलंब होणार आहे. टाटानगर ते इतवारी एक्सप्रेस १२ मे रोजी रद्द करण्यात आली. मुंबईहून ११ मे रोजी निघणारी मुंबई-हावडा एक्सप्रेस पावणेतीन तास विलंबाने सोडण्यात आली. योगनगरी ऋषिकेश येथून ११ मे रोजी निघणारी योगनगरी ऋषिकेश-पुरी उत्कल एक्सप्रेस दीड तास उशिरा निघाली. दुर्ग येथून १२ मे रोजी निघणारी दुर्ग-राजेंद्रनगर साऊथ बिहार एक्सप्रेस दुर्ग येथून दीड तास विलंबाने निघेल. जबलपूर येथून ११ मे रोजी निघालेली जबलपूर-संतरागाछी हमसफर एक्सप्रेसच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. ही गाडी राऊरकेला -हटिया-मुरी टाटानगर मार्गे धावत आहे.

# साक्रीरोड परिसरात आमदार फारूक शाह यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ...!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महिंदळे येथील हालोर यांच्या घरापासून ते डी.पी. रस्त्यापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण करणे कामाचा आ.फारुख शाह यांच्याहस्ते शुभारंभ करण्यात आला. हद्दवाढीने समाविष्ट झालेल्या गावात मूलभूत सोई सुविधा पुरविण्यासाठी धुळे महानगरपालिका अपयशी ठरली आहे. मोठ्याप्रमाणात मालमत्ता कराची रक्कम नियमितपणे अदा करूनदेखील सुविधा न देणाऱ्या पालिकेच्या विरोधात गावातील नागरिकांमध्ये मोठ्याप्रमाणात असंतोष पसरलेला आहे.या भागातील नागरिकांनी केलेल्या मागणीनुसार आ.फारुख शाह यांनी ग्रामविकास विभागाकडे तगादा लावला त्यानुसार ग्रामविकास विभागाने २५१५ लेखाशीर्ष अंतर्गत निधी उपलब्ध करून दिलेला आहे.



आतापर्यंत आ. फारुख शाह यांनी धुळे शहराच्या विकासासाठी नगरविकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, उद्योग विभाग, सामाजिक न्याय विभाग, अल्पसंख्यांक विभाग, क्रीडा विभाग, महिला व बालकल्याण विभाग मार्फत मोठ्याप्रमाणात निधी खेचून आणला आहे. धुळे मतदारसंघात निव्वळ शहरी भागाचा समावेश आहे. अशा परिस्थितीत शहराच्या विकासासाठी ग्रामविकास विभागाकडून निधी खेचून आणण्याची किमया आ.फारुख शाह यांनी केली आहे. त्याअंतर्गत धुळे मनपा क्षेत्रात हद्दवाढीने समाविष्ट झालेल्या महिंदळे येथील हालोर यांच्या घरापासून ते डी.पी. रस्त्यापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण करणे या ३० लक्ष खर्चाच्या कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी आ.फारुख शाह यांच्यासोबत नगरसेवक नासिर पठाण,नगरसेवक सईद बेग,प्यारेलाल पिंजारी,जमील खाटीक,आसिफ शाह दिलीप पारेराव,भूरा पाटील रघुनाथ हालोर, सतीश सैंदाणे विशाल देसले शोभा बडगुजर सुनिता भोपे मालुबाई सैंदाणे मधुमाला मोरे सुरेखा कुवर शोभा पाटील शुभम माळी अभिषेक सूर्यवंशी अजय बागुल हजर होते.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सलटींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# संतुलित आहार, व्यायामामुळे मोठ्या आजारांवर मात करता येते

## डॉ. साहिल शर्मा : छत्रपती संभाजीनगरच्या होल्डिंग हँड्सचा पंजाबातील लुधियाना येथे परिसंवाद

आधुनिक केसरी न्यूज

**लुधियाना :** आपले शरीर एखाद्या यंत्रासारखे आहे, जसे आपण आपल्या कारची वेळेवर सर्व्हिसिंग करून घेतो, त्याचप्रमाणे आपल्या शरीराची वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक आहे. समतोल आहार आणि नियमित व्यायामाकडे लक्ष दिल्यास आपण मोठ्या आजारांवर मात करू शकतो, असे पंजाब मधील नेक्स्ट लेव्हल हेल्थ अँड लाइफस्टाइल मॅनेजमेंट, गुरू विहार, लुधियाना येथे छ. संभाजीनगर ( औरंगाबाद ) ची होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्थेच्या लुधियाना शाखेतर्फे आयोजित केलेल्या आरोग्य विषयक परिसंवादात डॉ. साहिल शर्मा बोलत होते. होल्डिंग हँड्सच्या सचिव अपर्णा मेहता यांनी होल्डिंग हँड्सच्या कार्याचा परिचय करून दिला. झूमवरही हा सोहळा पार पडला, परदेशात राहणारे भारतीय लोकही झूमवर सामील झाले. यावेळी अपर्णा मेहता, डॉ.शिफू जैन, नरेंद्र शर्मा, गुरुप्रीत, विकी कुमार, गुरदीप कुमार, गीता शर्मा, पंकज खुराना, वैशाली, प्रेम बाला, मृणाल मेहता, रुधव मेहता आदी उपस्थित होते. झूम ॲपवरही हा कार्यक्रम प्रसारित करण्यात आला, झूम द्वारे देश विदेशातील लोकांनी या परिसंवादाचा लाभ घेतला. सुरेश सिरसीकर संस्थापक अध्यक्ष असलेल्या छ. संभाजीनगर ( औरंगाबाद ) ची होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्था ही आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, महिला सबलीकरण, सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम आणि आपत्कालीन विषयावर काम करते. होल्डिंग हँड्सच्या पंजाब, महाराष्ट्र, दिल्ली, कर्नाटक येथे शाखा आहेत. सुरेश सिरसीकर या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून अपर्णा मेहता या संस्थेच्या सचिव आहेत.




# महासंमेलनास लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे

## महेशसिंह ठाकूर यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येत्या रविवारी छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा संस्कृतीक मन्डळच्या मैदानावर हिंदवी सुर्य महाराणा प्रतापसिंह सकल राजपूत समाज महा मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यात राज्यभरातून दोन लक्ष राजपूत बंधू भगिनी येतिल आपण शुद्धा सोयगाव, सावळदबारा, तोरनाळा, डाभा, नादांगाव, फत्तेपूर, रवळा, जवळा, पळसखेड व सिल्लोड परिसरातील राजपूत बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महेशसिंह ठाकूर यांनी केले आहे. हा कोणत्याही पक्षाचा मेळावा नाही, यामुळे या मेळाव्यात जास्तीत जास्त राजपूत समाजातील बंधू भगिनींनी यावे व आपल्या रास्त व सनदशीर मागण्या मान्यवरांसमोर ठेवाव्या. भारत सरकारचे संरक्षण मंत्री राजनाथसिंह, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अन्य मंत्री व आमदार, खासदार या मेळाव्यासाठी येत आहेत. यातून यापुढे राजपूत समाजाचे संघटन मजबूत होणार आहे. या समाजातील विद्यार्थी वर्गाला जातीचे प्रमाण पत्र मिळण्यास व वैधता प्रमाण पत्र मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर होतील. राज्यात या जतिच्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय शाळा व वसतीगृह सुरु होण्यास चालना मिळेल. महाराष्ट्र राज्यात हा समाज खुप मोठ्या सन्खेने आहे मात्र शैक्षणिक मागासलेपणा व आर्थिक दुर्बलता अधिक आहे, त्यामूळे आर्थिक विकास महामंडळ व्हावे अशी जी मागणी आहे तील चालना मिळेल, विखुरलेल समाज संघटीत होईल, दुरावा संपेल रोटी-बेटी व्यवहार वाढेल, मुल-मुली उच्च शिक्षण प्राप्त करतील व देशाच्या जडण घडणीत आपल्या पुर्वजाप्रमाणे हात भार लाऊन देशाच्या मातीशी पूर्वीसारखे एकरूप होतील. अनेक विधायक व रचनात्मक कार्य गती घेतील आणी विशेष म्हणजे या समाजावर विनाकारण तोड सुख घेणारे, व सारखे तक्रार करणारे यांच विनाकारण तोंड सुख घेणारे, व सारखे तक्रार करणारे यांच्या तोंडाला कुलुप लागेल तरी राजपूत बांधवांनी व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.



# आकर्षक सजावटीने उजळला तरडगावचा बुद्ध विहार

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** तरडगाव, ता.फलटण येथील धम्मकुटी बुद्धविहारात बुद्धपौर्णिमेच्या निमित्ताने आकर्षक सजावट करून बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. बुद्धविहारावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.राहुल मित्र मंडळ व माता रमाई महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बुद्धपौर्णिमा संपन्न होत असताना यावेळी सामुदायिक त्रिशरण,पंचशील,बुद्धपूजा आदी विधी संपन्न करण्यात आले.बौद्ध उपासक आणि उपासिका पांढरेशुभ्र वस्त्र परिधान करून आले होते.सर्वांनी पंचांग प्रणाम करीत तथागत भगवान गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. सकापासूनच बुद्ध भीम गिते लावण्यात आल्याने धम्ममय वातावरण तयार झाले होते. क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त १३ एप्रिल रोजी महिलांसाठी अभिनेत्री मेघना




झुंझम यांचा मनोरंजनात्मक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम संपन्न घेण्यात आला होता. त्यांच्याकडून होम मिनिस्टर... खेळ पैठणीचा हा कार्यक्रम घेण्यात आला होता.यातून कार्यक्रमातून विजेत्या ठरलेल्या काजल नैनेश मोहिते यांना बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून पैठणी देत सन्मान करण्यात आला. जयंती उत्सव यशस्वी पणे संपन्न केल्याने राहुल मित्र मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार मंडळाचे जेष्ठ मार्गदर्शक ॲड.आनंद गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला.जेष्ठ मार्गदर्शक मोतीराम गायकवाड, ॲड. आनंद गायकवाड,अमोल गायकवाड, अभिलाष गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केली. कार्यक्रमास विशेष सहकार्य अमोल गायकवाड, संदीप गायकवाड, शशिकांत गायकवाड,नितीन गायकवाड, विक्रम गायकवाड, ॲड.आनंद गायकवाड, प्रसाद गायकवाड यांनी केले.या वेळी राहुल मित्र मंडळाचे अध्यक्ष अक्षय गायकवाड,विजय गायकवाड गुणवंत गायकवाड, शशिकिरण गायकवाड, श्रीधर गायकवाड,महेश कांबळ, संकेत गायकवाड, आदित्य गायकवाड, सुमेध गायकवाड, आयुष बनसोडे बादल गायकवाड, नितीन काकडे,शुभम गायकवाड यांच्या सह मंडळाचे सर्वच कार्यकर्ते व छोटे चिमुकले यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कांबळे यांनी केले तर राहुल मित्र मंडळाचे अध्यक्ष अक्षय गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानले.

# महात्मा गांधी तंटामुक्त अध्यक्षपदी सत्तार शब्बीर पटेल

आधुनिक केसरी न्यूज

**खूलताबाद :** लोणी तालूखा खूलताबाद येथे आज 12 / 5/ 20223 रोजी लोकनियूक्त सरपंच गूलशन बि सत्तार पटेल यांच्या आध्यक्षात ग्राम सभा घेन्यात आली. यात सत्तार पटेल यांच्या समाजसेवेची दखलघेत ग्रामसेभेचे आध्यक्ष तथा लोणी गावाचे लोकनियूक्त सरपंच गूलशन बी सत्तार पटेल यांच्या सूचने नूसार सत्तार शब्बीर पटेल यांची उपस्थित सर्व गावकर्यानीं एकमाताने निवङ करून ठराव पास केला सत्तार शब्बीर पटेल यांच्या निवडीबद्दल माजी उपसरपंच सत्तार सूभान पटेल उप सरपंच बळीराम दांडेकर ग्रा.प.चे जेष्ठ सदस्य मोइन पटेल, कैसर पटेल, माजी सरपंच गूलाबनबी पटेल, ग्रामविकस आधीकारी प्रशांत वाघमारे, रूबीना सांडू पटेल, चेरमन यास्मीन कदीर पटेल, व्हाइस चेरमन गणेश दांडेकर, मूजीफ मास्टर, सागर दांडेकर, ज्ञानेश्वर दांडेकर, सी. आर. पी. यास्मीनताई, आहेमद महेबूब पटेल, जूबेर यूनूस पटेल, आरेफ पटेल, आलताफ पटेल, तेजराव दांडेकर, अंकूश जाधव, सचिन आहिरे, पंडित सोनवने, बाळू सोनवने यांच्यासह मोठया संखेने उपस्थित सर्व गावकऱ्यांनी स्वागत करून शूभेच्छा दिल्या.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर